


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२६ ■ सोमवार, दि.२३ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## चांदी १५ हजारांनी महागली

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** लग्नसराईच्या हंगामात आज सोमवारी सोने-चांदीच्या दरात मोठी वाढ झाल्याचे दिसून आले.देशांतर्गत कमोडिटी मार्केट शनिवार आणि रविवारी बंद असल्याने सर्वांच्या नजरा सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी सुरू होणाऱ्या बाजाराकडे लागल्या होत्या. आठवड्याच्या पहिल्याच ट्रेडिंग दिवशी, सराफा बाजारात मोठे उलटफेर झाले आहेत. चांदीच्या दरात झटक्यात १५हजार रुपयांनी वाढ झाली तर सोन्याची किंमतही तीन हजार रुपयांनी वाढून ट्रेड करत आहेत.

# अजितदादा महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री – देवेंद्र फडणवीस

■ अर्थसंकल्पीय अधिवेशनाला झाली सुरुवात ■ महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजितदादा कायम स्मरणात राहतील

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. अधिवेशनाच्या आधी राजकीय वातावरण चांगलेच तापलेले आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतरचे हे पहिलेच अधिवेशन आहे. तर सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळातील पहिलेच अधिवेशन असणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर महाविकास आघाडीने बहिष्कार टाकला होता. त्यामुळे हे अधिवेशन चांगलेच वादळी ठरण्याची शक्यता आहे.

अजित पवारांविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत त्यांचे कौतुक केले. अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते, असे स्पष्ट विधान त्यांनी केले. क्षमता, निर्णयक्षमता आणि प्रशासनातील पकड यांचा विचार केला तर मुख्यमंत्रीपदासाठी आवश्यक असलेले सर्व गुण दादांमध्ये होते, असे त्यांनी सांगितले. राज्याला एक चांगला मुख्यमंत्री मिळू शकला असता; मात्र ते घडले नाही, ही खंत त्यांनी व्यक्त



केली. महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजितदादा ही दोन नावं त्यांच्या कामामुळे कायम स्मरणात राहतील, असेही त्यांनी नमूद केले. फडणवीस म्हणाले की, दादांची राजकीय कारकीर्द मोठी आणि प्रभावी होती. राजकारणात ते अजून मोठी इनिंग खेळतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र जीवनाच्या प्रवासात त्यांनी पहिल्यांदाच टायमिंग चुकवले, असे भावनिक विधान त्यांनी केले. दादांचा वक्तशीरपणा सर्वपरिचित होता, त्यामुळे हे अचानक घडलेले वास्तव अधिक वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. याची सर्वाधिक हळहळ आपल्याला राहील, असेही ते म्हणाले.फडणवीस यांनी सांगितले की, अजितदादांसोबत त्यांचे नाते केवळ राजकीय नव्हते, तर ते अधिक वैयक्तिक आणि भावनिक होते. दादा माझ्यापेक्षा ११ वर्षांनी मोठे होते. खऱ्या अर्थाने ते माझे दादाच होते, असे ते म्हणाले. २०१४ नंतर दोघांमध्ये अधिक जवळीक निर्माण झाली आणि एका दशकाहून अधिक काळ परस्परांमध्ये मैत्री व सुसंवाद राहिला. दादांचे अस्तित्व सभागृहात ठळकपणे जाणवायचे. प्रत्येक काम वेळेत आणि शिस्तीत व्हावे, यावर त्यांचा कटाक्ष असायचा. सकाळी ६ वाजता कामाला सुरुवात करण्याची त्यांची सवय होती, याचा उल्लेख करत त्यांनी त्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. विधानसभेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. आज दादा आपल्यात नाहीत, ही खंत मनाला चटका लावणारी आहे, असे सांगताना त्यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. यंदा दादांनी आपला १२ वा अर्थसंकल्प सादर केला असता आणि पुढील वर्षी १३ वा अर्थसंकल्प मांडून बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या विक्रमाशी बरोबरी केली असती, असे त्यांनी नमूद केले. पुढील काळात सर्वाधिक अर्थसंकल्प मांडणारे अर्थमंत्री म्हणून त्यांचे नाव नोंदले गेले असते; मात्र अचानक त्यांच्या जाण्यामुळे ही परंपरा थांबली, असेही ते म्हणाले. या वेळी अर्थसंकल्प मांडण्याची जबाबदारी स्वतःवर आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### उगाच थातूरमातूर रिपोर्ट नको - रोहित पवार

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी रोहित पवार यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी अजित पवारांच्या विमान अपघाताचा पारदर्शन तपास व्हावा, अशी मागणी केलीये. ते म्हणाले, 'आम्हाला या प्रकरणावर राजकारण करायचे नाही, पण एक मराठी माणूस म्हणून आणि अजित काकांचा पुतण्या म्हणून सत्य बाहेर येणे गरजेचे आहे. तपासात कोणत्याही प्रकारची लपवाछपवी होऊ नये, यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढत राहू, असे म्हटले आहे.

### राज्यपालांच्या अभिभाषणात विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात मुंबईत राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दोन्ही सभागृहांना संबोधित करताना सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजना मांडल्या आणि विकसित महाराष्ट्र घडवण्याचा निर्धार व्यक्त केला. राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्शांनुसार काम करण्याची ग्वाही देत त्यांनी राज्याच्या आर्थिक प्रगतीचा सविस्तर आढावा दिला. महाराष्ट्र देशातील थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करणारे अग्रगण्य राज्य ठरले असून २०२४-२५ मध्ये १६ लाख कोटी रुपयांची एफडीआय राज्यात आली, जी देशातील एकूण गुंतवणुकीच्या ३९ टक्के आहे, असे त्यांनी नमूद केले. देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात राज्याचा वाटा १३ ते १३.५ टक्क्यांहून अधिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# राष्ट्रीय आरोग्य मेळाव्यात सहभागी व्हा

♦ केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आवाहन

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**शेगाव:** आयुष मंत्रालय, भारत सरकार व अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने शेगाव येथे २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या भव्य मेळाव्याचा शुभारंभ २५ फेब्रुवारी रोजी महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार असून, याप्रसंगी राज्यपाल, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी आढावा बैठक घेऊन प्रशासकीय यंत्रणेला सज्ज राहण्याचे निर्देश दिले .

या चार दिवसीय मेळाव्यामध्ये दररोज आरोग्य तपासणी व आवश्यक औषधींचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. याकामी आरोग्य विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, सर्व आयुष वैद्यकीय अधिकारी व फार्मासिस्ट यांनी मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून आपली सेवा प्रदान करावी, अशा सूचना मंत्री महोदयांनी दिल्या आहेत. मेळाव्यात ६६ औषधी स्टॉल्स व ३५ हून अधिक आरोग्य तपासणी स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. तळागाळातील गरजू लोकांपर्यंत या मेळाव्याची माहिती पोहोचवण्यासाठी आशा वर्कर्सनी घरोघरी जाऊन प्रभावीपणे प्रबोधन करावे. विशेषतः २६ फेब्रुवारी रोजी आशा वर्कर्ससाठी 'आजीबाईचा बटवा' या घरगुती आयुर्वेदिक उपचार प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून, या प्रशिक्षणास सर्वांची उपस्थिती अनिवार्य आहे.परिवहन विभागाने बसस्थानके व बसेसमध्ये मेळाव्याच्या माहितीचे स्टिकर्स लावून नागरिकांना प्रोत्साहित करावे. २७ फेब्रुवारी रोजी मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व मोतीबिंदू शस्त्रक्रिया नोंदणी शिबिर पार पडेल. तसेच 'वयोश्री' व 'एडीआयपी' योजनेअंतर्गत दिव्यांग बांधवांची आणि ६० वर्षांवरील वृद्धांची आरोग्य तपासणी व साहित्य नोंदणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आरोग्य व समाज कल्याण विभागाच्या मदतीने विशेष मोहीम राखावी. पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि पार्किंगचे चोख नियोजन करावे, तसेच नगरपरिषदेने मेळावा परिसरातील स्वच्छतेचे व्यवस्थापन करावे, असे निर्देशही मंत्री महोदयांनी यावेळी दिले.जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी यावेळी प्रशासकीय सज्जतेचा आढावा सादर केला.



### केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली पाहणी

केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज शेगाव येथे विविध ठिकाणांना भेटी देऊन महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नियोजित दौऱ्याच्या पूर्वतयारीची सविस्तर पाहणी केली. आयुष मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने येत्या २५ फेब्रुवारी रोजी शेगाव येथे 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६' चे आयोजन करण्यात आले असून, या सोहळ्याला राष्ट्रपती महोदयांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्र्यांनी कार्यक्रम स्थळ, सुरक्षा व्यवस्था आणि इतर तांत्रिक बाबींचा बारकाईने आढावा घेतला. या भेटीदरम्यान केंद्रीय मंत्री श्री. जाधव यांनी राष्ट्रपतींच्या आगमनासाठी तयार करण्यात येत असलेले हेलिपॅड, कडेकोट सुरक्षा बंदोबस्त आणि मुख्य सोहळ्याच्या ठिकाणची पाहणी केली. राष्ट्रीय आरोग्य मेळाव्यासाठी येणाऱ्या रुग्ण आणि नागरिकांच्या बसण्याची व्यवस्था, विविध पॅथींचे स्टॉल्स, औषध वितरण केंद्र आणि रुग्ण तपासणीसाठी उभारण्यात येत असलेल्या विशेष स्टॉल्सच्या तयारीचा त्यांनी प्रत्यक्ष आढावा घेतला. आरोग्य मेळाव्यात येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण भासणार नाही आणि तपासणी प्रक्रिया सुलभ राहील, याची दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी यावेळी संबंधित विभागांना दिल्या.

# राष्ट्रपतींच्या शेगाव दौऱ्यामुळे श्री गजानन महाराजांच्या दर्शन वेळेत बदल

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

♦ भाविकांनी नोंद घेण्याचे आवाहन

**शेगाव (बुलढाणा):** देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू २५ फेब्रुवारी रोजी शेगावच्या दौऱ्यावर येत आहेत. या ऐतिहासिक दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, सुरक्षा आणि राजशिष्टाचाराच्या कारणास्तव श्री गजानन महाराज संस्थानच्या दर्शन व्यवस्थेत काही तासांचा बदल करण्यात आला आहे. मंगळवार (दि. २४) आणि बुधवार (दि. २५) फेब्रुवारी रोजी दर्शन काही काळासाठी स्थगित राहणार असल्याने भाविकांनी याची नोंद घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठी सुरक्षा आणि सुव्यवस्थेचे कडेकोट नियोजन करण्यात आले आहे. त्याचे तपशील खालीलप्रमाणे आहे. मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६: जिल्हा प्रशासनाच्या वतीने या दौऱ्याची 'रंगीत तालीम' आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव, सकाळी १०:३० ते दुपारी १२:०० या कालावधीत श्रींचे दर्शन स्थगित राहील. त्याच बरोबर बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६: राष्ट्रपतींचे शेगावमध्ये आगमन होत असल्याने, सुरक्षेच्या दृष्टीने सकाळी ७:३०



ते दुपारी १२:३० या वेळेत श्री दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद राहील. दुपारी १२:३० नंतर दर्शन व्यवस्था पुन्हा पूर्ववत सुरू होईल. दररोज हजारो भाविक श्रींच्या दर्शनासाठी शेगावला येतात. या दोन दिवसांत होणाऱ्या बदलांमुळे भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी संस्थानने ही सूचना प्रसिद्ध केली आहे. जे भाविक सध्या प्रवासात आहेत किंवा दर्शनासाठी शेगावला येण्याचे नियोजन करत आहेत, त्यांनी वरील वेळेचे पालन करून दर्शन व्यवस्थेत सहकार्य करावे, अशी विनंती श्री गजानन महाराज संस्थानने केली आहे.

# विदर्भ, मराठवाड्यासह कोकणला अवकाळी पावसाचा फटका!

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**नागपूर :** विदर्भासह मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये रविवारी रात्रीच्या सुमारास जोरदार पाऊस पडल्याची माहिती समोर आली आहे. विदर्भातील नागपूर, गोंदिया आणि भंडारासह मराठवाड्यातील बीड, लातूरसह धाराशिवमध्येही पावसाने दमदार हजेरी लावली.

अवेळी पडलेल्या या विजांच्या कडकडाटासह पावसामुळे रब्बी हंगामातील काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. परिणामी शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

नागपुरात मध्यरात्री वादळी वाऱ्यासह जोराचा अवकाळी पाऊस झाला. यामुळे अनेक सखल भागात पाणी साचल्याचे दिसून आले. तर काही ठिकाणी मोठी झाडं उन्मळून पडली. दुसरीकडे नागपूरच्या मनिष नगर परिसरातील अंडरपासमध्ये गुडघाभर पाणी साचले होते. त्यामुळे चाकरमान्यांना आज सकाळच्या सुमारास याच पाण्यातून मार्ग काढावा लागला. शिवाय यावेळी मोठ्या वाहतूक कोंडीचाही फटका सहन करावा लागला आहे. मनीषनगर प्रमाणे अशीच काहीशी परिस्थिती सोनेगाव, सोमलवाडा भागात पाहायला मिळाली आहे. दरम्यान नागपूर वेधशाळेने दिलेल्या माहितीनुसार विदर्भात व मध्यभारताच्या वर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे विदर्भात पुढची दोन दिवस अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# बारावी पेपरफुटी प्रकरण ; कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्यालाही अटक

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

♦ मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता

**नागपूर :** नागपूर शहरात बारावी परीक्षेतील पेपर फुटल्याच्या धक्कादायक प्रकारामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. बारावीच्या दोन पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाअंती कोचिंग क्लास चालकासह एका विद्यार्थ्याला या प्रकरणी पोलिसांनी अटक केली आहे. राज्यात खळबळ उडविणाऱ्या या पेपर फुटीच्या प्रकरणात नागपुरातून मोठी कारवाई करण्यात आली असून सदर पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निशिकांत मूल (४५, मानकापूर) असे ट्युशन क्लासेस चालवणाऱ्या संचालकाचे नाव आहे. तर फरहान अख्तर असे अटक करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे नाव आहे. सेंट उर्सुला हायस्कूल परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकामुळे हा प्रकार उघड झाला होता. यात रसायनशास्त्राच्या पेपरच्या वेळेपूर्वीच व्हॉट्सॲपवर प्रश्नपत्रिका आल्याचे पुढे आले होते. दरम्यान, वारंवार प्रसाधनगृहात गेलेल्या विद्यार्थिनीवर संशय आल्याने तिची झडती घेतली असता स्मार्टफोन आढळून आला. त्यानंतर हा मोबाईल जप्त करत तपासणी केली असता मोबाईलमध्ये परीक्षा सुरू होण्यापूर्वीच १०.३७ ला पेपर, प्रश्नांसोबत उत्तरेही एका व्हॉट्सॲप ग्रुपवर आढळून आले. रोमन आकड्यात '१२' नावाच्या २१ सदस्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर निशिकांत मूलच्या क्रमांकावरून पेपर पाठवल्याचे उघड झाले. यात बारावीच्या विज्ञान शाखेचे फिजिक्स आणि केमिस्ट्रीचा पेपर परीक्षेच्या तासाभरापूर्वीच व्हॉट्सॲपवर आल्याची माहिती आहे. गुरुवारी बारावी केमिस्ट्रीचा पेपर होता. मात्र परीक्षेआधी पेपर विद्यार्थ्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर आला होता. नागपूर शहरातील सदरच्या सेंट उर्सुला परीक्षा केंद्रावर हा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान प्रकरण उघड होताच तो क्रमांक निशिकांत मूल याने बंद केला. १६ फेब्रुवारीचा फिजिक्स पेपरही मोबाईलमध्ये सापडला होता.


# CLASSIFIED

**मसाज**

ऑईल मसाज, क्रीम मसाज, स्क्रब मसाज, ड्राय मसाज, डीप टिशू मसाज, अरोमा मसाज, हेड, फेस, फुट, होम सर्विस मिळेल.
हॉटेलमध्ये मसाज सेवा देताना हॉटेलमध्ये मुक्कामी राहणारी फॅमिली हवी.

मो. 8600232257

**विकणे आहे**

होंडा एक्टिवा १२५ डिस्क जाने २०२२ ३२,४०० कि.मी. विकणे आहे.
किंमत ५८०००/-
--संपर्क--
मो. 9665263310

**अर्जंट भरती**

ॲमेझॉनमध्ये पार्सल डिलेव्हरी करीता मुले पाहिजे.
पद - १०
पगार- १४०००+ २.५ PL Petrol
लोकेशन- अमरावती चांदूररेल्वे
कागदपत्रे - आधार, पॅन, ड्रायव्हींग लायसन, दुचाकी, 5 जी स्मार्टफोन.
--संपर्क--
मो. 9960637255

**तार फेन्सींग**

तार फेन्सींग प्लॉट व शेतीला वाजवी दरात करुन मिळेल.
२० वर्षाचा अनुभव
संपर्क
R.R.Construction
9860828949

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649


# कृषी उत्पन्न बाजार समितीत खरेदीदाराचा अडत्यांना 1 कोटी 84 लाखाचा चुना

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्य खरेदी व्यवहारात १ कोटी ८४ लाख ९९ हजार ५६८ रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची तक्रार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रितेश मडगे यांनी शहर पोलिस स्टेशनला दिली. संबंधित व्यापाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीत धान्य खरेदी परवाना घेऊन खरेदीदाराने अडत्यांमार्फत शेतकऱ्यांकडून सोयाबीनसह इतर धान्याची खरेदी केली. मागील तीन महिन्यांत ८४२८.६६ क्विंटल सोयाबीनची खरेदी करण्यात आली असून, या व्यवहारातून बाजार समिती नियमानुसार आकारले जाणारे बाजार शुल्क (०.५ टक्के) आणि शासनाची देखरेख फी (०.५ टक्के) भरणे बंधनकारक असताना खरेदीदाराने रक्कम भरण्यासाठी टाळाटाळ केली. या खरेदी व्यवहाराची एकूण रक्कम सुमारे १ कोटी ७५ लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यावर आकारण्यात आलेले बाजार समिती व शासनाचे शुल्क तसेच काटा माप फी मिळून सुमारे ९ लाख ९८ हजार ५६८ रुपयांची थकबाकी असल्याचे तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे. जानेवारी २०२६ पर्यंत संबंधित व्यापाऱ्यांनी ही रक्कम अदा केली नसल्याने त्यांना वारंवार सूचना देण्यात आल्या. मात्र, कंपनीकडून पैसे मिळाल्यानंतर सर्व रक्कम भरू, असे आश्वासन देत त्यांनी वेळकाढूपणा केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर पोलिस स्टेशनला तक्रार मिळाली. परंतु हे प्रकरण एक कोटी रुपयांच्या वर असल्याने ते आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केले आहे. असे शहर पोलिस स्टेशनचे निरीक्षक अजित जाधव यांनी सांगितले.

# मेळघाटातील राणीगाव घाटामध्ये पिकअप वाहनाला अपघात

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

♦ चार जण जागीच ठार दहा ते बारा जन जखमी

**धारणी :** मेळघाटातील धारणी तालुक्यातील ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या राणीगाव , सुसर्दा, शिवाझीरी नारदु या रस्त्याने प्रवास करत असलेली पिकप वाहन रस्त्यावरील खड्ड्यामुळे पन्नास फूट दरीत पलटी झाली त्या मध्ये बसणाऱ्या चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर उर्वरित दहा ते बारा जण गंभीर जखमी असून त्यांना उपचार करता रुग्णवाहिकेने धारणी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले असल्याची माहिती आहे

प्राप्त माहितीनुसार राणीगाव गावालगत असलेल्या कंजोली गावातील नागरिक रविवार ला मध्य प्रदेशातील देडतलई येथील आठवडी बाजाराकरिता राणीगाव, शिवाझीरी, सुसरदा, नारदु,झिल्पी ,मार्गे मध्य प्रदेशातील देडतालई येथे आठवडी बाजाराकरिता पिकअप वाहनाने १५ ते २० जण गेले होते तेथून बाजार आटपून येत



असताना सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान पिकअप वाहन राणी गाव ते शिवाझिरी घातवळणाच्या रस्त्या दरम्यान घोडादेव बाबा जवळ असलेल्या धामणनाला या ठिकाणी रस्त्यावर खड्डे असल्यामुळे पिकप वाहन ५० फूट खोल दरीत पलटी झाले त्यात कंजोली येथील पाच जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे तर उर्वरित दहा ते बारा जण हे गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचाराकरिता धारणी उपजिल्हा रुग्णालयात पाठवलेत असल्याची माहिती वृत्त लिये पर्यंत प्राप्त झाली होती.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## तडीपार इसम अटकेत

**अमरावती :** २१/०२/२६ रोजी रात्री गुन्हे शाखेचे पथक पो स्टे राजापेठ हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना न्यू हाईस्कूल मैदानात तडीपार इसम नामें सागर रामदुलार यादव, वय ३२ वर्ष,रा. चिंचफैल ,अमरावती हा हातात चाकू घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करीत असताना मिळून



आल्याने त्याला त्याब्यात घेऊन त्याच्याकडून १ चाकू कि अ १०००/रु चा मुद्देमाल जप्त करून पो स्टे राजापेठ येथे कलम १४२ मपोका सहकलम ४/२५ शस्त्र अधिनियम सहकलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# यवतमाळ जिल्ह्यातील नेर परसोपंतच्या निकिताने पटकावले सर्वाधिक सुवर्ण

## ♦ अमरावती विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ थाटात, १२२ सुवर्ण, २२ रौप्य, २४ रोखसह पारितोषिकांची लयलूट

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ४२ वा दीक्षांत समारंभ थाटात पार पडला. यामध्ये सर्वाधिक सुवर्ण यवतमाळ जिल्ह्यातील नेरपरसोपंत येथील नेहरू महाविद्यालयाची विद्यार्थीनी निकिता किशोर पुनसे हिने सहा सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. या समारंभात १२२ सुवर्ण, २२ रौप्य आणि २४ रोख पारितोषिकांसह १६८ पारितोषिकांची लयलूट करण्यात आली.

विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठ परिसर, अमरावती येथे थाटात सुरू झाला होता. या समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते होते. याप्रसंगी माजी सरन्यायाधीश भूषण गवई, जनरल मनोज पांडे (निवृत्त), माजी भारतीय लष्कर प्रमुख,




पी.व्ही.एस.एम. (परम विशिष्ट सेवा मेडल), ए.व्ही.एस.एम. (अति विशिष्ट सेवा मेडल), व्ही.एस.एम. (विशिष्ट सेवा मेडल) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दीक्षांत समारंभाला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय या कार्यक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सर्व सभासद तसेच सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता उपस्थित होते.

या दीक्षांत समारंभामध्ये ४२,३१७ पदवीकांक्षींना पदवी व २५५ पदवीकांक्षींना पदविका प्रदान करण्यात आल्या.यामध्ये मानव विज्ञान विद्याशाखा १०७८७, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा ७९१३, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा १७१५५ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा ४४३३, या व्यतिरिक्त स्वायत्त शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती ४५१, स्वायत्त शारीरिक शिक्षण महाविद्यालय (एच.व्ही.पी.एम.), अमरावती ८५२, स्वायत्त शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती ४३९, स्वायत्त प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड रिसर्च, बडनेरा १७७ व स्वायत्त पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, अमरावती ११० इतक्या पदवीकांक्षींना देण्यात आले आहे. संलग्नित महाविद्यालयांतील पात्र पदविकाधारकांची विद्याशाखानिहाय संख्या : मानव विज्ञान विद्याशाखा ६, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा १२३, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा १७ आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा १०९ अशी आहे.

### पदक, पारितोषिकांमध्ये मुलींचीच बाजी

या दीक्षांत समारंभामध्ये पदके/पारितोषिकांसाठी मुले व मुलींमध्ये सर्वाधिक नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील निकीता किशोर पुनसे या विद्यार्थीनीला सुवर्ण ६ व रोख पारितोषिक १, आर.ए. कला, एम.के. वाणिज्य व एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील पल्लवी बालकृष्ण राठोड या विद्यार्थीनीला सुवर्ण ५ व रौप्य १, तर श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव येथील तेजस्विनी विठ्ठल भगत व विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील साईरी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थीनीला सुवर्ण ४, असे पारितोषिक घोषित झाले आहेत. ८५ विद्यार्थ्यांना पदके देवून गौरवान्वित करण्यात आले. यामध्ये मुली ६७, तर मुले १८ आहेत. म्हणजे जवळपास ८० टक्के मुलींनी पदके प्राप्त केली आहेत.

### डी.लीट, पीएचडीप्राप्त विद्यार्थी

डॉ. कमल रामक्रिष्ण गवई यांना मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयात वाङ्मय पंडित (डी.लिट) या सर्वोच्च पदवीने सन्मानित आले. विद्याशाखानिहाय ४६६ संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. यात विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत २०७, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत ७४, मानव विज्ञान विद्याशाखेत १२१ आदींचा समावेश आहे. आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेत ६४ आचार्य पदवीधारक आहेत.

# मेळघाटात खा. बळवंत वानखडे यांचा इशारा !

## ♦ ४० हजार आदिवासी मजुरांच्या अस्तित्वासाठी खासदार बळवंत वानखडे रणांगणात

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**चिखलदरा:** केंद्र सरकार जाणीवपूर्वक मनरेगा कायदा कमकुवत करून तो इतर योजनांमध्ये विलीन करण्याचा प्रयत्न करत आहे. ग्रामीण व आदिवासी मजुरांच्या हक्काची कायदेशीर हमी काढून घेण्याचा हा डाव असून मेळघाटातील ४० हजार मजुरांचे आयुष्य या योजनेवर उभे आहे. मजुरांच्या हक्कावर कुठलाही घाला घातला, तर रस्त्यावर उतरून तीव्र संघर्ष उभारू,ङ्ग असा थेट इशारा खासदार बळवंतराव वानखडे यांनी दिला. चिखलदरा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित 'मनरेगा बचाव यात्रे'चे नेतृत्व करताना ते बोलत होते.

माजी मंत्री अॅड. यशोमती ठाकूर व काँग्रेस पक्षाचे अमरावती जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या संकल्पनेनी यात्रेची सुरुवात करण्यात आली.

**दुर्गम भागात झंझावाती दौरा; मजुरांच्या वेदनांना थेट स्पर्श**



काजलडोह येथून प्रारंभ झालेली यात्रा डोमा, बामादेही, काटकुंभ, बगदरी, गांगरखेडा, कोरडा आणि काला पांढरी, कामिदा या अतिदुर्गम गावांमधून मार्गक्रमण करत गेली. ठिकठिकाणी हजारो मजुरांनी उत्स्फूर्त स्वागत करत आपल्या समस्या मांडल्या. खासदार वानखडे यांनी मजुरांच्या रांगेत बसून त्यांच्याशी संवाद साधत त्यांच्या न्याय्य हक्कासाठी संसदेपासून रस्त्यापर्यंत लढण्याची ठाम ग्वाही दिली.

**४० हजार कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न; भीषण संकटाची चाहूल**

सभेला संबोधित करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, 'मेळघाटातील जवळपास ४० हजार मजूर कुटुंबे केवळ मनरेगाच्या उत्पन्नावर जगत आहेत. जर हा कायदा कमकुवत केला किंवा इतर योजनांमध्ये समाविष्ट करून त्याची स्वतंत्र ओळख संपवली, तर हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल. मोठ्या प्रमाणावर स्थलांतर वाढेल आणि आर्थिक विवंचना तीव्र होईल.

त्यांनी पुढे ठाम मागणी केली की मनरेगा मजुरी किमान ४०० रुपये प्रतिदिन करण्यात यावी आणि १०० दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी प्रभावीपणे कायम ठेवावी. केंद्र सरकार राज्यांवर आर्थिक बोजा टाकून योजना निष्प्रभ करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत त्यांनी तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला.यात्रेतील ठोस मागण्या

१. मनरेगा मजुरी दर प्रतिदिन किमान ४०० रुपये करण्यात यावा.

२. १०० दिवसांच्या रोजगाराची कायदेशीर हमी कायम ठेवून बळकट करावी.

३. मनरेगा कायद्याची स्वतंत्र ओळख कायम ठेवावी व तो इतर योजनांमध्ये विलीन करू नये.

४. मजुरीची १००ङ्ग देयके केंद्र सरकारने वेळेवर आणि थेट अदा करावीत.

या यात्रेचे नियोजन तालुकाध्यक्ष सहदेव बेलकर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल येवले, पीयूष मालवीय आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केले.

यावेळी विक्की राठोड, राजेश सेमलकर, किशोर झाडखंडे, राकेश झाडखंडे, सोनाजी सावलकर, सज्जू कासदेकर, ललिता बेठेकर, रामलाल काळे, विनायक कवडे, अंकुश कवडे, सुखदेवराव कवडे, महिपतसिंग उईके, शेख नौशाद, संदीप अलोकार, सुनील उईके, अमित बेलकर, हेमू आठोले, धनराज आठोले, वर्मासिंग सलामे, चितराम बेठेकर, संदीप मुंडे, मिलिंद सेमलकर, संजू जामुनकर, जय झाडखंडे, पतिराम चिमोटे, राजकुमार बेलकर यांच्यासह हजारोंच्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मनरेगामध्ये कार्यरत रोजगार सेवक व मजूरवर्ग उपस्थित होता. या यात्रेला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे मेळघाटातील आदिवासी मजुरांमध्ये नव्या लढ्याची ऊर्जा निर्माण झाली असून, पुढील काळात हा संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# अटींमुळे 'पीएम सूर्यघर' योजनेवर टांगती तलवार

## ♦ जिल्हा सोलर वेंडर असोसिएशनकडून निवेदन

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**खामगाव :** महावितरणने १३ फेब्रुवारी २०२६ पासून कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय सौरऊर्जा क्षमतेवर नवीन निर्बंध लादले आहेत. या निर्णयामुळे केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम सूर्यघर-मोफत वीज योजने'च्या अंमलबजावणीत मोठे अडथळे निर्माण झाले असून, हजारो ग्राहकांचे आणि सोलर व्यावसायिकांचे भवितव्य धोक्यात आले आहे. या गंभीर प्रश्नावर बुलढाणा जिल्हा सोलर वेंडर असोसिएशनने २१ फेब्रुवारी रोजी कामगार मंत्री अॅड. आकाश फुंडकर यांची खामगाव येथील भाजप कार्यालयात भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. महावितरणने छतावरील सौरऊर्जा बसविण्याच्या नियमात बदल केले आहेत. पूर्वी ग्राहक त्यांच्या गरजेनुसार ३ किलोवॅट, ५ किलोवॅट क्षमतेचा प्लांट बसवू शकत होते.असोसिएशनच्या मते, हे निर्बंध 'इलेक्ट्रिसिटी अॅक्ट २००३' (कलम ७ व २) आणि 'मर्क' (एमईआरसी) नियमावली ६.२ चे थेट उल्लंघन करतात, जे ग्राहकाला स्वतःची वीज निर्मिती करण्याचे स्वातंत्र्य देतात. राज्यातील ५० ते ६० टक्के निवासी ग्राहक या निर्णयामुळे प्रभावित होणार आहेत. सुमारे ६० टक्के बुक केलेल्या ऑर्डर आता धोक्यात आल्या आहेत.कमी क्षमतेच्या प्लांटमुळे ग्राहक 'पीएम सूर्यघर' अंतर्गत मिळणाऱ्या पूर्ण सबसिडीपासून वंचित राहत आहेत. जर महावितरणने हे जाचक निर्बंध या आठवड्यात मागे घेतले नाहीत, तर ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशन आणि स्थानिक असोसिएशनच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

## बसची धडक लागून ६५ वर्षीय वृद्ध जखमी; गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती :** शहरातील गर्ल्स हायस्कूल चौकात बसने दिलेल्या धडकेत ६५ वर्षीय वृद्ध जखमी झाले आहेत. हा अपघात शनिवारी (२२ फेब्रुवारी) दुपारी घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, जखमी वृद्धाचे नाव गिरिजा वसावे असे आहे. बसची धडक लागल्याने त्यांना दुखापत झाली असून उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून (RIMC) प्रवेश पात्रता परीक्षा ७ जून रोजी

**अमरावती:** महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय भारतीय सैन्य महाविद्यालय, डेहराडून येथे इयत्ता आठवीसाठी प्रवेशपात्रता परीक्षा' दि. ०७ जून २०२६ रोजी पुणे येथे घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी मुले व मुली प्रविष्ट होऊ शकतात. या परिक्षेसाठी विद्यार्थी, विद्यार्थीनी उमेदवार दि. ०१ जानेवारी, २०२७ रोजी कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेमध्ये इयत्ता ७ वी वर्गात शिकत असावा किंवा ७ वी उत्तीर्ण झालेला असावा. या परीक्षेसाठी परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे दि. ०५ एप्रिल २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कार्यालयास सादर करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थीनी/विद्यार्थ्यांचे वय दि. १ जानेवारी २०२७ रोजी ११.१/२ (अकरा वर्ष सहा महिने) पेक्षा कमी व १३ (तेरा) वर्षापेक्षा अधिक नाही असे विद्यार्थी परीक्षेस पात्र समजण्यात येतील. म्हणजेच विद्यार्थ्यांचा जन्म दि. २ जानेवारी २०१४ च्या आधी आणि दि. १ जुलै २०१५ च्या नंतरचा नसावा. आवेदनपत्र प्राप्त करण्याची प्रक्रिया परीक्षेचे माहितीपत्रक, आवेदनपत्र व जुन्या प्रश्नपत्रिकांचे संच राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, डेहराडून उत्तराखंड पिन कोड २४८००३ यांचेमार्फत मागवता येणार आहे.

# स्वच्छतेचा महामेरू कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा


'तीर्थी धोंडापाणी, देव रोकडा सज्जनी...' असे म्हणत समाजाला अंधश्रध्देतून बाहेर काढणारे आणि हातात झाडू घेऊन ग्रामस्वच्छतेचा मंत्र देणारे थोर संत म्हणजे गाडगे बाबा. आजच्या आधुनिक काळातही गाडगे बाबांचे विचार समाजाला दिशा देणारे आहेत. १ मे १९८३ रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने या विद्यापीठाला संत गाडगे बाबांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांचे विचार व कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे, त्यांच्या विज्ञानवादी दृष्टीकोनातून नवसंकल्पनेतील विद्यार्थी तयार व्हावा, या उद्देशाने ४ मे २००५ रोजी त्यांचे नाव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला दिले.

### संत गाडगे बाबांचे बालपण

संत गाडगे बाबा यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७३ साली अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यात येणा-या शेणगांव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जाणोरकर असे होते. त्यानंतर दापुरा या गावी त्यांचे बालपण गेलं. अन्याया विरुध्द लढण्याची शक्ती त्यांना मिळाली. लहानपणापासूनच त्यांना समाजसेवेची ओढ होती. गरिबी आणि कष्टात वाढलेल्या संत गाडगे बाबांनी समाजातील अज्ञान जवळून पाहिले होते. संत गाडगे बाबा यांनी संसाराचा त्याग करून लोकसेवेचा मार्ग धरला आणि अंगावर गोधडी आणि हातात खापर (गाडगे) घेतले, त्यानंतर लोक त्यांना 'गाडगे बाबा' म्हणू लागले. त्यांनी कधीही स्वतःचे मंदिर बांधले नाही किंवा स्वतःची पूजा करू दिली नाही.

### स्वच्छतेचा ध्यास

संत गाडगे बाबा कोणत्याही गावात गेले की सर्वात आधी ते हातात झाडू घेऊन रस्ते आणि नाले साफ करीत असे. गावक-यांनाही आपल्या श्रमातून स्वच्छतेचे महत्त्व ते पटवून देत असत. ठदेव मंदिरात नसून तो माणसात आहे आणि परिसर स्वच्छ असेल तरच आरोग्य चांगले राहील, असा संदेश त्यांनी आयुष्यभर दिला. बाबांचा संदेश महाराष्ट्र राज्यस्तरावरच नव्हे, तर देशपातळीवर सुध्दा पोहचला. त्यांच्या नावाने स्वच्छतेसाठी पुरस्कार सुरू झालेत.



### कीर्तनातून समाजप्रबोधन

संत गाडगे बाबांचे कीर्तन हे केवळ भक्तीचे साधन नव्हते, तर ते समाजप्रबोधनाचे शस्त्र होते. ते कीर्तनातून लोकांना प्रश्न विचारत ठतुम्ही दगडाला देव मानता, पण भुकेलेल्या माणसाला का भरवत नाही? शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते आपल्या मुलांना द्या. गाडगे बाबांनी व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन आणि हुंडाबळी यांसारख्या प्रथांवर कडाडून टीका केली. त्यांचे अखेरचे कीर्तन विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासनाच्यावतीने मुद्रित करण्यात आले. त्यांनी कीर्तनातून सर्वसामान्यांना केलेला उपदेश विद्यापीठाने पुनर्जीवित करुन सर्वांपर्यंत पोहचविला.

### गाडगे बाबांची दशसूत्री

गाडगे बाबांनी समाजाला 'दशसूत्री' दिली, जी आजही अमरावती विद्यापीठात आणि समाजमनात आचरली जाते. भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड नागड्यांना वस्त्र, गरीब मुलामुलींना शिक्षण, बेघरांना आश्रय, अंध-पंगूंना औषधोपचार, मुक्या प्राण्यांना अभय, बेकारांच्या हाताला काम, दुःखी-कष्टी लोकांना धीर, गरीब तरुण - तरुणींचे लग्न अशी गाडगे बाबांची दशसूत्री आजही अनेक सामाजिक संस्था, नागरिक कसोशिने पालन करीत आहेत. विद्यापीठाच्यावतीने दशसूत्रीचे पालन तंतोतंत होत आहे. सर्व विभागांच्या दर्शनी भागावर विद्यापीठ परिसरात दशसूत्री लावलेली आहे. संविधान शिल्प या ठिकाणी सुध्दा दशसूत्री लावण्यात आली असून त्या माध्यमातून गाडगे बाबांचे रोकडाधर्मचे विचार तरूण पिढीपर्यंत पोहचत आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सपत्नीक दिव्यांग मुलींचे कन्यादान करुन एक आदर्श समाजापुढे ठेवला. याशिवाय श्री गाडगे महाराज वृध्दाश्रमातील सर्व वृध्दांना त्यांच्या हस्ते शालचे वितरण करण्यात आले.

शिक्षण हेच प्रगतीचे साधन आहे, हे ओळखून त्यांनी अनेक शाळा, धर्मशाळा आणि रुग्णालये उभारली. अमरावती येथील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे त्यांच्याच नावाने ओळखले जाते, जे आज विदर्भाच्या शैक्षणिक प्रगतीचे केंद्र आहे. गाडगे बाबांचे कार्य पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे देखील प्रभावित झाले होते. गाडगे बाबांनी आपल्या अनेक संस्थांची जबाबदारी योग्य व्यक्तींकडे सोपवून निःस्पृह भावनेने कार्य केले. संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीनुसार कार्य करणा-या संस्था, व्यक्तींना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून दरवर्षी पुरस्कृत करण्यात येते. याही वर्षी येत्या २६ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार-२०२५ कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे. कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृति श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २००३ पासून विद्यापीठाने सुरू केला. आजवर २२ संस्था व व्यक्तींना हा पुरस्कार देवून विद्यापीठाने सन्मानित केले आहे. यावर्षीपासून हा पुरस्कार व्यक्ती व संस्था गटात स्वतंत्रपणे दिला जात आहे. यावर्षी व्यक्तीगटात श्री मनिष रमेशराव पावडे, अमरावती यांना तर संस्थागटात दिव्या फाऊंडेशन, वखंड, जि. बुलडाणा या संस्थेला प्रदान होत आहे. प्रत्येकी ५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. संत गाडगे बाबांनी सांगितलेली सामाजिक सेवा, दशसूत्रीनुसार कार्य करण्यासाठी समाजातील अनेक व्यक्ती वा संस्थांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांचे कार्यापासून अनेकांना सामाजिक कार्याची प्रेरणा मिळावी, हा महत्तम उद्देश आहे. २० डिसेंबर १९५६ रोजी या थोर महात्म्याने अमरावती शहरालगत असलेल्या वलगाव नजीक पेढी नदीकाठी अखेरचा श्वास घेतला. त्या ठिकाणी आज त्यांच्याच नावाने गोरगरीबांसाठी वृध्दाश्रम देखील सुरू आहे. गाडगे बाबांनी दिलेला स्वच्छता आणि विषमतेविरुध्दचा लढा आजही जिवंत आहे. ठगोपाला गोपाला देवकी नंदन गोपालाठ या त्यांच्या आवडत्या भजनाप्रमाणेच त्यांचे कार्य आजही महाराष्ट्राच्या कानाकोप-यात घुमत आहे. विद्यापीठातील अध्यासन केंद्राच्या माध्यमातून सुध्दा गोरगरीबांना कपडे वाटप, समाजप्रबोधनात्मक विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन बाबांचे कार्य व विचारांचा प्रचार व प्रसार केल्या जात आहे. संत गाडगे बाबांना त्यांच्या जयंतीप्रसंगी अभिवादन.

**-डॉ. विलास नांदुरकर**
**जनसंपर्क अधिकारी**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला**
**ई-निविदा सुचना ३५/२०२५-२०२६**
**जावक क्रमांक १२९४/ ईनिसु-३५/ निलि/ २०२६ / दिनांक- १८.०२.२०२६**

email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No: 0724-2435195

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता य-९ नमुन्यातील काम क्र.१ ते ५ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून व-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ **https://www.mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील माझोड़ बाभूळगांव रस्ता कि.मी. ५२/०० ते ६५/०० ची सुधारणा करणे. | ५५५१०६९४ | पात्र |
| २ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील निंभोरा दोनवाडा एकलारा कपिलेश्वर कौलखेड मीनासे बोरगांव सोनाळा येळवण प्रजिमा-३० कि. मी. ११/०० ते १८/०० ची सुधारणा करणे. | ८०१०५७६८ | पात्र |
| ३ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील डाबकी अमानतपूर ताकोडा खडकी सांवंगी मोहाडी भोड रस्ता कि.मी. ०/०० ते १५/५०० ची सुधारणा करणे. | ५५६८९४४२ | पात्र |
| ४ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील मनसगांव निंबा डाबकी रेल्वे गेट ते रा.म. कि.मी. ४२/५०० ते ४४/०० ची सुधारणा करणे. | ४८०५९५६८ | पात्र |
| ५ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत अकोला जिल्ह्यातील नागद सागद हाता हातरूण आगर उगवा प्रजिमा-९ कि.मी. २५/०० ते ३२/०० ची सुधारणा करणे. | ३९६०९५९९ | पात्र |

**अटी व शर्ती-**

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. ई-निविदा काम क्र.१ ते ५ कामांची ई-निविदा दिनांक २३.०२.२०२६ रोजी १०,०० पासून दिनांक ०२.०३.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलांड व हॅश सवमीशन करता येतील. ई-निविदा कामांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक ०४.०३.२०२६ (पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे)

३. वरील कामांची निविदा पूर्व बैठक दिनांक २५.०२.२०२६ रोजी वेळ- १२.०० वाजता मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे आयोजित करण्यात येईल.

४. वरील काम क्र. ०१ ते ५ कामांची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील

५. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in

६. इंतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सुक्ष्म प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

७. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई-निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्या जाणार नाही.

८. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
कार्यकारी अभियंता
सा.बा. विभाग, अकोला

आरओसी-२०२५-२६/क्र. -५/C6063

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## गुरुवारी तेल्हाऱ्यात विराट हिंदू संमेलन

**तेल्हारा:** येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ज्ञानपीठ नगरपरिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा क्र. १च्या प्रांगणात गुरुवार २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता सकल हिंदू समाज द्वारा विराट हिंद संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हिंदू समाजाच्या जनजागृतीच्या उद्देशाने सकल हिंदू समाजाकडून सनातन संस्कृती, सनातन हिंदू धर्म तथा सामाजिक एकतेचे प्रतीक विराट हिंदू संमेलनाचे मुख्य वक्ते अंजनगाव सुर्जी (जि. अमरावती) येथील श्री देवनाथ मठ, श्रीनाथ पीठाचे पीठाधीश्वर पूजनीय स्वामी जितेंद्रनाथ महाराज, विद्यार्थी परिषदेच्या पल्लवीताई कुलकर्णी तथा विदर्भ प्रांत गौसेवा समिती अकोलाचे विवेक बिडवाई उपस्थित राहणार आहेत. हिंदू संमेलनाची सांगता राम खिचडी प्रसाद वितरणाने होणार आहे. समस्त हिंदू समाज बंधू-भगिनींनी संमेलनास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## बुध्दीबळ व कॅरम स्पर्धेचे पारितोषिक वितरण



**अकोला:** ब्रिलियंट चेस अकादमी व प्रो कोड अकादमी च्या वतीने गोरक्षण रोड येथे नुकतीच १० ,१८ वर्षा आतील मुला मुलीची बुध्दिबळ व स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेचे उदघाटन प्रो कोड अकादमीच्या संस्थापिका वर्षा पटेल व जितेन्द्र अग्रवाल याच्या हस्ते करण्यात आले. त्यानी यावेळी खेळाडुना राज्य आणि राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत चागली कामगिरी करावी या साठी शुभेच्छा दिल्यात.यावेळी त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिक वितरित करण्यात आले.यात १० वर्षा आतील मुलाच्या बुध्दिबळ गटात प्रथम राजवीर बागडे, द्वितीय अशुमन खराटे, तृतीय सोहम घोगडे,चतुर्थ प्रियाश ठोकळ,पंचम सार्थक चिनी आले तर १८ वर्षा आतील मुलाच्या गटात प्रथम प्रित नकले, द्वितीय शौनक रत्नाळीकर, तृतीय सिद्धात खोबरागडे, चतुर्थ अर्जुन साळुके,पंचम ब्रज भाला तर १८ वर्षा आतील मुलीच्या गटात प्रथम स्वरा देशमुख,द्वितीय वैदेही कुकडकर, तृतीय भावी भाला आलेत. १० वर्षा आतील मुलाच्या कॅरम स्पर्धेत प्रथम सोहम घोगडे, द्वितीय अगस्त कराणी आदींना बक्षिसे देण्यात आलीत. ही स्पर्धा अकोला महानगर डिस्टीक्ट चेस असो. चे अध्यक्ष संदीप पुडंकर व प्रभजीत सिंह बछेर याच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

# राहणापूर आदिवासी चिमुकल्या विद्यार्थ्यांची अंगणवाडी भरते मदतनीसच्या अंगणात

पवन बेलसरे २३ फेब्रुवारी

**अकोट:** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या आदिवासी बहुल गाव राहणापूर येथील अंगणवाडीची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गावातील अंगणवाडीची इमारत पूर्णतः जीर्ण झाली असून खोलीमध्ये मोठमोठे शीद्र पडून उखीर काढण्यात आला आहे. परिणामी सुरक्षित व बंदिस्त जागेअभावी चिमुकल्यांना उघड्यावर किंवा जिथे जागा मिळेल तिथे शिक्षण घेण्यासाठी अंगणवाडी भरवावी लागत आहे.

सुमारे ९० टक्के आदिवासी वस्ती असलेल्या या गावात जवळपास ३० ते ३५ चिमुकले विद्यार्थी अंगणवाडीत शिक्षण घेत आहेत. मात्र पावसाळ्यात विजांचा कडकडाट व वरून पाऊस त्यामध्ये चिखल उन्हाळ्यात कडक ऊन आणि हिवाळ्यातील थंडी अशा प्रतिकूल परिस्थितीत लहान कोवळ्या चिमुकल्यांना बसण्याची वेळ



आली आहे. यामुळे त्यांच्या आरोग्याबरोबरच शिक्षणावरही विपरीत परिणाम होत आहे.

अंगणवाडी ही बालकांच्या सर्वांगीण विकासाची पहिली पायरी मानली जाते. इथेच मुलांना प्राथमिक शिक्षण, पोषण आहार व मूलभूत सवयींचे धडे दिले जातात. परंतु शिक्षणाचा पाया मजबूत असणे गरजेचे असताना राहणापूरमध्ये प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही पायाभरणीच कमकुवत होत असल्याची खंत ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

गावकऱ्यांनी तातडीने नवीन अंगणवाडी इमारत बांधून देण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. आदिवासी बहुल गावात जर ही परिस्थिती असेल, तर विकासाच्या दाव्यांचे काय? आदिवासी नागरिकांचा वाली प्रशासनासहित लोकप्रतिनिधी सुद्धा उरला नाही. असा सवालही ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. चिमुकल्यांच्या भवितव्याच्या शिक्षणासाठी संबंधित विभागाने तात्काळ पाहणी करून निधी मंजूर करत सुरक्षित व सुसज्ज अंगणवाडी उभारावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

चिमुकल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रशासनाने वेळीच लक्ष घालून राहणापूरच्या अंगणवाडीला न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

◆ ३० - ३५ मुलांच्या सुरक्षेशी खेळ

आदिवासी ३० ते ४० मुलं अंगणवाडी सेविकेच्या अंगणात उघड्यावर बसतात वरंड्यात मी मोठा साप बघितला भर दिवसा वन्यप्राणी शेतकऱ्यावर हल्ला करतात मुलांची जबाबदारी कोण घेणार प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे.

**हरीश आंधळे**
राहणापुर ग्रामस्थ

अंगणवाडी पूर्ण शिकस्त झाली केव्हाही पडेल चिमुकल्या विद्यार्थ्यांना उघड्यावर बसण्याची वेळ आली आहे चिमुकल्यांच्या शिक्षणासाठी अंगणवाडी प्रशासनाने द्यावी,

**गीताबाई नागरगोजे**
रहणापूर आदिवासी महिला

## शिवस्मारक उभारण्यावरून भगिनीवर हल्ला

◆ मराठा महासंघ व सकल मराठा समाजाच्या वतीने निदर्शने



प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला:** बुलढाणा जिल्ह्यातील चिखला गावामध्ये २० रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारणाऱ्या शिव भक्त महिलेवर गावातील सरपंच आणि काही गावकरी लोकांनी यांनी जोडजमाव करून हल्ला , कपडे फाडून मारहाण करून विनयभंग केला. त्या निषेधार्थ धिंगरा चौकात अखिल भारतीय मराठा महासंघ व सकल मराठा समाजाच्या वतीने निदर्शने करून या घटनेचा निषेध केला व अशा सर्व समाज कंटकांना अटक करून त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली.

यावेळी विनायकराव पवार, कृष्णा अंधारे, योगेश थोरात, संजय सूर्यवंशी, योगेश ढोरे, निखिल ठाकरे, काशिनाथ पटेकर, कल्पनाताई बिडवे, माधुरीताई वाघमारे, रश्मीताई पटेकर, कमलजीत कौर, प्रदीप चौरे, अरुण खोटरे, ॲड. संतोष धोत्रे, प्रदीप लुगडे, प्रमोद वाकडे, दीपक गावंडे, अमित जोगनपुत्र , अवचार आदी उपस्थित होते.

## मेंढपाळांची लहान मुले शिक्षणापासून वंचित

कुशल भगत २३ फेब्रुवारी

**कुटासा:** मेंढपाळ उन्हाळ्यात मेंढ्या चारण्यासाठी बाहेर पडतो. उन्हा, तान्हात मेंढ्या चारण्यासाठी या गावातून त्या गावात भटकंती करतो. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याला खूप संघर्षमय प्रवास करावा लागतो. एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात जावे लागते. अकोला जिल्ह्यात अनेक मेंढपाल अकोट तालुक्यातील ग्रामीण भागात दाखल झाले आहेत.भटकंती मध्ये मुलांचे शिक्षण बाजूला राहते.

उन्हाळ्यात आलेले मेंढपाळ पावसाळा सुरू होई पर्यंत राहतात तर भर पावसाळ्यात त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. उन्हाळ्यातही ऊन सहन करावे लागते, तर पावसाळ्यात पाऊस अंगावर झेलावा लागतो. लहान



लहान मूल घेऊन मेंढपाळांची भटकती सुरू असते. मुलांना चागले शिक्षण मिळत नाही. विविध प्रकारचे सण आनंदाने साजरे करता येत नाहीत, राहण्यासाठी घर नाही की दार नाही, अशा परिस्थित जीवन जगताना मानवी जीवनाचाही विसर पडतो. मेंढपाळांच्या या दशेवरून मेंढपाळांची सरकारने दखल घेतली पाहिजे, असा प्रश्न नक्कीच निर्माण होतो. दिवसेंदिवस वाढत्या संकटांमुळे पारंपारिक मेंढपाळ व्यवसाय तोट्यात येऊ लागला आहे. त्यामुळे स्थानिक चराऊ गायरान खुली करून निवाड्याची परवानगी द्यावी, अशी मागणी मेंढपाळांकडून होत आहे.

मेंढपाळ आपल्या शेळ्या-मेंढ्यांचा फौजफाटा घेऊन गावोगावी भटकंती करीत असतात. शेतकरी आपल्या शेतात मेंढ्या बसवून घेतात. या शेळ्या-मेंढ्यांचे मलमूत्र शेतात पडते. या खतामुळे जमिनीचा पोत सुधारत असल्याने आपल्या शेतात मेंढ्या बसवण्यासाठी शेतकरी आग्रही असतात. एका रात्री शेळ्या, मेंढ्या शेतात बसविण्यासाठी तांदूळ किंवा पैसे देतात.पाऊस पडेपर्यंत हे मेंढपाळ गावोगावी भटकंती करीत असतात. त्यातून त्यांच्या उदरनिर्वाहाबरोबरच शेळ्या, मेंढ्यांच्या चाऱ्यांचा प्रश्न सुटतो.

मेंढपाळ लहान मुलांसह, संपूर्ण कुटुंब चाऱ्याच्या शोधत जिल्हा जिल्ह्यात भटकंती करत असतो.लहान वयातच मुलांना मेंढ्यांचे मागे उन्हा पावसात फिरत असल्याने. त्यामुळे मुलांना स्थानिक शाळांतील शिक्षण अर्धेवर सोडून द्यावे लागत असल्याने मेंढपाळ चे मुल शिक्षणापासून दूर होत आहे.

## गझल नवाज भीमराव पांचाळे यांच्या शब्दसुरांच्या भावयात्रेमध्ये रसिक मंत्रमुग्ध

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला :** शास्त्रीय स्टेडियममध्ये शनिवारी रात्री प्रख्यात गजल गायक भीमराव पांचाळे आणि त्यांची कन्या भाग्यश्री पांचाळे - गायकवाड यांनी सप्तसुरांची मैफिल सजवली. रसिकांनी दाद दिली.



त्यांना हार्मोनियमवर साथ देणारे संगीतकार सुधाकरराव अंबुसकर, बासरी वादन करणारे प्रशांत अग्निहोत्री, गिटार वादक संदीप कपूर, तबलावादक देवेंद्र यादव, आणि खुमासदार आणि तितक्यात विनोदी शैलीने संचालन करणारे निवेदक किशोर बळी. असा काहीसा मंचाचा साज असलेल्या मैफलीत भिमराव दादांच्या मुखातून सादर होणाऱ्या प्रत्येक गझल व त्यामधील शेर रसिकांच्या हृदयाचा ठाव घेत होता.

आणि त्या जोडीला रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळत होता. संपूर्ण सभामंडप रसिक आणि भीमराव दादांच्या गायकीला, त्यांच्या जुगलबंदीला साक्ष देत होता.

## निधन वार्ता

**भास्करराव वानखडे**



**अकोला:** कातखेड येथील भास्कर यशवंतराव वानखडे (५२) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, पत्नी व असा आप्तपरिवार आहे.

## पीयुसी सेवेसाठी आधारप्रमाणित मोबाईल क्रमांक आवश्यक

**अकोला:** पीयुसी सेवेसाठी वाहनमालकाचा आधार प्रमाणीकरण केलेला मोबाईल क्रमांक असणे अनिवार्य करण्यात आले आहे. वाहन मालकांचे अद्ययावत संपर्क तपशील वाहन प्रणालीत उपलब्ध नसल्याने पीयुसी, विमा, दंड, कर(ई-चलान) आदी वाहनासंबंधी सूचना वाहनधारकांपर्यंत पोहोचविण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे पीयुसी सेवेसाठी वाहनमालकाचा आधार प्रमाणीकरण केलेला मोबाईल क्रमांक उपलब्ध नसेल तर पीयुसी सेवा देण्यात येणार नाही, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिका-यांनी केले आहे.

## लहान मुलांनी रमजानचा पहिला रोजा ठेवला

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** पवित्र रमजान महिन्याला उत्साहात सुरुवात झाली असून शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.मुस्लिम बांधवांकडून रोजा, नमाज व प्रार्थनेतून आत्मशुद्धीचा संकल्प केला जात आहे. विशेष म्हणजे दर वर्षी प्रमाणे यंदा लहान मुलांनीही रोजा पाळत समाजासमोर आदर्श ठेवला. मो.इमरान हे लक्ष्मी बाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात मूर्तिजापूर मध्ये रूग्ण वाहिका गाडी मध्ये २० वर्ष पासून सेवा देत आहे. यांचा ५ वर्षीय मुलगा मोहम्मद शहरोज मोहम्मद इमरान आणि मोहम्मद आरिज मोहम्मद इमरान (वय ९ ) यांनी रमजानचा पहिला रोजा ठेवला. इतक्या लहान वयात उपवास पाळण्याचा निर्धार करत त्यांनी धार्मिक परंपरेची जपणूक केली.



चिमुकल्यांच्या या कृतीचे परिसरात कौतुक होत असून त्यांच्या श्रद्धा व चिकाटीमुळे अनेकांना प्रेरणा मिळत आहे.

## जन्म प्रमाणपत्र प्रणाली हॅक प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी व्हावी : जावेद जकारिया

◆ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला :** महाराष्ट्रातील जन्म प्रमाणपत्र प्रणाली हॅक झाल्याच्या कथित प्रकरणावर राज्य शासनाने तात्काळ अधिकृत खुलासा करून उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश संघटक सचिव जकरिया यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर निवेदन पाठविले आहे.



२० फेब्रुवारी रोजी अकोला येथे पत्रकारांशी बोलताना किरीट सोमय्या यांनी डिसेंबर महिन्यात महाराष्ट्रातील जन्म प्रमाणपत्र प्रणाली हॅक झाल्याचा गंभीर आरोप केला होता. काही परराज्यातील व्यक्तींनी थेट प्रणालीमध्ये प्रवेश करून हजारो बनावट जन्म प्रमाणपत्रे तयार केली व त्यानंतर फरार झाल्याचा दावा त्यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर जावेद जकरिया यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, जर हे आरोप सत्य असतील तर हा विषय राज्याच्या सायबर सुरक्षेसाठी अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. कोणत्याही राज्याची शासकीय प्रणाली हॅक होणे ही साधी बाब नसून शासन व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी संबंधित बाब आहे. आज जन्म प्रमाणपत्र प्रणाली हॅक झाली असेल तर उद्या इतर संवेदनशील शासकीय प्रणालीही धोक्यात येऊ शकतात, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

शासनाकडून या प्रकरणावर अद्याप अधिकृत व स्पष्ट खुलासा करण्यात आलेला नसल्याबद्दल त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. प्रणाली प्रत्यक्षात हॅक झाली का? बनावट प्रमाणपत्रे तयार झाली का? जबाबदार कोण? याबाबत जनतेसमोर वस्तुस्थिती मांडणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच संबंधित आरोप तथ्याधारित आहेत की केवळ प्रसिद्धीसाठी करण्यात आले आहेत, याबाबतही शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. दोषी आढळल्यास संबंधितांवर व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. शासनाने या प्रकरणाची वास्तविक स्थिती अधिकृतरीत्या जाहीर करावी. राज्याच्या सायबर सुरक्षा व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेऊन ती अधिक सक्षम करण्यात यावी. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात अशा गंभीर आरोपांवर मौन बाळगणे योग्य नाही. जनतेला सत्य जाणून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## यंदा मे महिन्यापर्यंत मिरचीचे भाव वधारलेले राहण्याची शक्यता

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला:** खमंग, झणझणीत, तर्री खाणाऱ्यांसाठी ही खरोखरच तिखट अशी बातमी आहे. म्हणजे गुड न्यूज नाही. कारण, यंदा पावसाने मिर्ची पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले असून यंदा मिर्चीचे भाव वधारल्याने कमी तिखटात फोडणीचा पर्याय गृहिणींसमोर असेल.

महाराष्ट्रात लाल मिरचीच्या दराने आता गगनभरारी घेतली आहे. अवकाळी पाऊस आणि बदलत्या हवामानाचा फटका मिरची उत्पादनाला बसला असून, आवक कमी झाल्यामुळे ग्राहकांच्या खिशाला चांगलीच कात्री बसली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत मिरचीचे दर किलोमागे ५० ते १०० रुपयांनी वाढले आहेत. बाजारातील मिरचीची आवक गेल्या वर्षीच्या तुलनेत ३० टक्क्यांनी घटली आहे. मिरचीचे उत्पादन कमी आणि मागणी जास्त असल्याने भाव वधारले आहेत. गेल्या वर्षी १८० रुपये किलो मिळणारी तेजा लवंगी ही यंदा अडीचशे रुपयांपर्यंत आली आहे. गुंटूर२०० च्या ऐवजी आता अडीचशे रुपये द्यावे लागतील. चपाटा (फाफडा) अडीचशे रुपये किलो मिळेल. काश्मिरी ७०० रुपये किलो, बेडगी५०० रुपये किलो भावाने



उपलब्ध झाली आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे मुख्य मिरची उत्पादनावर परिणाम झाला आहे. ढगाळ वातावरण आणि पावसामुळे मिरची वाळवणे आणि टिकवणे कठीण झाले आहे. योग्य सूर्यप्रकाश न मिळाल्याने मिरची खराब होण्याची शक्यता वाढली आहे.व्यापाऱ्यांच्या मते, मे महिन्यापर्यंत मिरचीचा सीझन असतो, त्यामुळे सध्यातरी भाव कमी होण्याची शक्यता कमी आहे.

## तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या विरोधात आमरण उपोषण

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील मौजे राजंदा येथील ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या कथित गैरप्रकारांविरोधात नागरिक आक्रमक झाले असून त्यांनी आजपासून, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. राजंदा येथील रहिवासी मयूर हरिभाऊ काळे यांनी



जिल्हाधिकारी यांना निवेदन देत ग्राम महसूल अधिकारी नाना इंगळे (भाग–१) व सुदेश चाराटे (भाग–२) तसेच राजंदा मंडळातील मंडळ अधिकारी यांची तात्काळ बदली करून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, संबंधित तलाठी हे गेल्या सुमारे २० वर्षांपासून एकाच गावात कार्यरत असून, शासकीय बदली धोरणाचे उल्लंघन झाले आहे. यासोबतच गावात अवैध मुरूम व वाळू उत्खनन आणि तस्करी दिवस-रात्र सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राजंदा येथील शिवाजी हायस्कूल लगत असलेली टेकडी अवैध उत्खननामुळे पूर्णपणे ढासळल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. अवैध मुरूम व वाळू वाहतूक करणारे ट्रक वेगाने रस्त्यांवरून धावल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासकीय मदत न मिळता, ती काही निवडक व्यक्तींनाच दिली जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणी तहसीलदार, बार्शीटाकळी यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. चौकशीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मंडळ अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी न करता तलाठ्यांची बाजू घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# आता सरपंच प्रशासक म्हणून कार्यभार स्वीकारणार

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींच्या मुदती संपल्याने यावर शासकीय अधिकाऱ्यांची प्रशासकीय नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, आता ग्रामपंचायतींच्या निवडणुका लवकरच होणार असून, त्या निवडणुकांपर्यंत सरपंचच प्रशासन पाहतील, अशी घोषणा ग्रामीण विकास मंत्रालयाने केली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार सुरळीत सुरू होणार आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकांपर्यंत सरपंच प्रशासक म्हणून कार्यभार स्वीकारणार असल्याने या गावांमध्ये विकास कामांना गती मिळेल. सरपंच वर्गाने कार्यकाळ संपण्यापूर्वीच धुमधडाक्यात विकास कामे सुरू केली होती, मात्र आता आणखी सहा महिन्यांचा कालावधी मिळाल्यामुळे विकास कामांना अजून वेग मिळणार असल्याचे सरपंचांनी सांगितले.

# रेमंड कंपनीला 280 कोटींचा तोटा

## संपाच्या पार्श्वभूमीवर कामगारांना कामावर परतण्याचे आवाहन

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी



**यवतमाळ :** यवतमाळच्या औद्योगिक नकाशावर महत्त्वाचे स्थान असलेली Raymond UCO Denim कंपनी सध्या २८० कोटी रुपयांच्या तोट्यात असल्याची माहिती समोर आली आहे. आर्थिक अडचणींमुळे कंपनीच्या भवितव्याबाबत औद्योगिक वर्तुळात चिंतेचे वातावरण आहे. त्यातच प्रलंबित मागण्यांसाठी कामगारांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याने तणाव अधिक वाढला आहे. सुमारे १,७८० कामगारांना रोजगार देणारी ही कंपनी स्थानिक अर्थचक्राचा कणा मानली जाते. मात्र वेतनवाढीच्या मुद्द्यावरून व्यवस्थापन आणि कामगार संघटना आमनेसामने आल्याचे चित्र आहे.

२०२४ मध्ये मान्यताप्राप्त संघटनेने वेतनवाढीचा प्रस्ताव मांडला होता. हा विषय सध्या कामगार न्यायालयात प्रलंबित असल्याचे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. २१ ते ३१ जुलैदरम्यान झालेला संप बेकायदेशीर असल्याचा दावा करत या काळात कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले. संपादरम्यान कमी करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेतल्याचे तसेच त्या कालावधीतील वेतन अदा केल्याचेही स्पष्ट करण्यात आले. १६ फेब्रुवारी रोजी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत चार वर्षांसाठी ५,९२६ रुपयांची वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापनाने मांडला. मात्र कामगारांकडून ७,२५० रुपयांहून अधिक वाढीची मागणी करण्यात आली आहे. गेल्या दशकभरापासून आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने अधिक वेतनवाढ देणे सध्या शक्य नसल्याची भूमिका कंपनीने घेतली आहे. दरम्यान, हेड ब्रांच नितीन श्रीवास्तव आणि मानव संसाधन प्रमुख चंद्रशेखर पातुरकर यांनी पत्रकार परिषदेत संवादासाठी दार खुले असल्याचे सांगत कामगारांनी संप मागे घेऊन उत्पादन सुरळीत करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले. वाढत्या तोट्याच्या छायेत आणि रोजगाराच्या सुरक्षेच्या प्रश्नांमुळे या चर्चेतून लवकर तोडगा निघतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पूस नदी पुल प्रकरण : मुख्यमंत्र्याच्या दरबारात, कंत्राटदारावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**पुसद :** पुसद-दिग्रस मार्गावरील पूस नदीवरील पुलाच्या बांधकामात कथित अनियमिततेच्या आरोपांमुळे प्रकरण आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दरबारी पोहोचले आहे. भाजप पदाधिकाऱ्यांनी 14.91 कोटी रुपयांच्या या प्रकल्पाविषयी गंभीर आरोप करत उच्चस्तरीय चौकशी आणि संबंधित कंत्राटदाराला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली आहे.




तक्रारदारांनी म्हटले आहे की, वर्क ऑर्डर क्रमांक 5263 टीसी नुसार 5 ऑगस्ट 2025 पर्यंत काम पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, फेब्रुवारी 2025 पर्यंतही काम अपूर्ण आहे, त्यामुळे विलंबाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागासोबतच जिल्हाधिकारी कडे देखील लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष रवी ग्यानचंदानी, जिल्हा सरचिटणीस दीपक परिहार, ॲड. विश्वास भवरे यांच्यासह उत्तर भारतीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष अश्विन जयस्वाल यांनी या प्रकरणावर गंभीर दखल घेत पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी होण्याची मागणी केली आहे. कंत्राटदार दोषी आढळल्यास त्याला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे, अशी जोरदार मागणी केली आहे. याशिवाय, कामाच्या ठिकाणी सुरक्षा उपाययोजना अपुरी असल्याचे, तसेच कामाच्या गुणवत्तेबाबत शंका उपस्थित केली आहे. कॉंक्रीट चाचण्या, तांत्रिक नोंदी आणि गुणवत्तेसंबंधी कागदपत्रांची अनुपस्थिती या बाबीही आरोपात नमूद करण्यात आले आहेत. पुसद शहराला दिग्रस, नागपूर आणि राष्ट्रीय महामार्ग 361 सी जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे येथे वाहतुकीचा दबाव मोठा असून, अपुरी सुरक्षा नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करू शकते, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. आता, मुख्यमंत्री स्तरावर या प्रकरणात हस्तक्षेप होईल की नाही, याकडे संपूर्ण पुसद तालुक्याचे लक्ष लागले आहे.




# बलात्कार प्रकरणातील आरोपी जेरबंद

## आरोपी मिलिटरीत ; तरुणीला लग्नाचे आमिष

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** २०१९ सालापासून बलात्काराच्या गुन्ह्यात फरार असलेला आरोपी रूपेश आनंदराव राजगे (वय २८, रा. कौडगाव पोस्ट काळी (दौ) याला अखेर वसंतनगर पोलीस स्टेशन च्या पथकाने अटक केली आहे. तब्बल सात वर्षापासून फरार आरोपीला गुप्त माहितीच्या आधारे पुसद शहरातून ताब्यात घेण्यात आले.

प्राप्त माहितीनुसार, २०१९ मध्ये फिर्यादी युवती पुसद येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना आरोपीसोबत तिचे प्रेमसंबंध होते. आरोपी मिलिटरी सेवेत असून सुट्टीवर गावी आल्यावर तो पुसद येथे येत असे. लग्नाचे आमिष दाखवून त्याने विठ्ठलवाडा परिसरातील भाड्याच्या खोलीवर तसेच सुदर्शन नगर परिसरात अनेक वेळा जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. नंतर लग्नास नकार देत जीव मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीने दि. १२ सप्टेंबर २०१९ रोजी तक्रार दाखल केली होती. या प्रकरणी अप.क्र. २८४/२०१९ अन्वये भादंवि कलम ३७६ (२)(एन), ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीने नागपूर खंडपीठ उच्च न्यायालय येथे एफआयआर रद्द करण्यासाठी अर्ज दाखल केला होता; मात्र न्यायालयाने तो फेटाळून लावला. त्यानंतर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र तयार करून कलम २९९ सीआरपीसी प्रमाणे न्यायालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान, आरोपी पुसद शहरात नातेवाईकांसोबत फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले व कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. ही कारवाई एसपी कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहायक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन, पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि शिवानंद स्वामी, सुरेश राठोड, मुनिया मोरे, श्रीकांत राठोड, संदीप चव्हाण, महिला चालक सुनीता राऊत

### सात वर्षापासून होता फरार

■ सदर आरोपी २०१९ पासून फरार होता. न्यायालयाने अर्ज नामंजूर करूनही तो हजर झाला नव्हता. अखेर सात वर्षांनंतर पोलिसांनी केलेल्या सतर्क व समन्वयपूर्ण कारवाईमुळे आरोपी पोलिसांच्या तावडीत सापडला आहे.

# विवेकानंद विद्यालयात 'शिव सामान्यज्ञान परीक्षा'

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**उमरखेड :** पळशीतील विवेकानंद विद्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित केलेली शिव सामान्यज्ञान परीक्षा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाली. या परीक्षेत 200 हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने संपूर्ण विद्यालय परिसर शिवमय वातावरणाने न्हालून गेला.

या परीक्षेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शिवचरित्राविषयी जागरूकता, स्वराज्य संकल्पनेची जाणीव, तसेच राष्ट्रप्रेम, शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि नैतिक मूल्यांची प्रेरणा देणे होता. परीक्षेत छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य, किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, प्रशासन व्यवस्था, गनिमी कावा, स्वराज्य स्थापनेतील संघर्ष आणि इतर महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना यावर आधारित प्रश्न विचारण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रथम पारितोषिक: विनयशील खडसे, द्वितीय पारितोषिक: शाश्वत गोरे, तृतीय पारितोषिक: आस्था येणकर, विजेत्यांना रोख रक्कम तसेच शिवरायांची आकर्षक मूर्ती देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास शिक्षक धनंजय चिंचोलकर, गोविंदराव नरवाडे आणि अरविंद बारस्कर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अध्यक्ष संकेत कदम, उपाध्यक्ष ऋषिकेश गोरे, सचिव श्रीकांत कदम, कमिटी सदस्य रवी कदम, आकाश सदावर्ते, दर्शन कदम यांच्यासह पालक आणि परिसरातील मान्यवर उपस्थित होते.



# 'शासन आपल्या दारी' संकल्पना प्रत्यक्षात उतरली : न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर



प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**यवतमाळ :** नागरिकांना थेट मार्गदर्शन, अर्ज प्रक्रिया, कागदपत्रांची पूर्तता आणि तात्काळ नोंदणी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारा विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा म्हणजे 'शासन आपल्या दारी' संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी होय, असे प्रतिपादन मुकुलिका जवळकर यांनी केले.

नेर येथील तालुका क्रीडा संकुलात आयोजित महाशिबिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ, जिल्हा प्रशासन व तालुका विधी सेवा समिती, नेर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी न्यायमूर्ती निवेदिता प्र. मेहता, न्यायमूर्ती नंदेश शं. देशपांडे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश शेखर च. मुनघाटे, जिल्हाधिकारी विकास मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

न्यायमूर्ती जवळकर म्हणाल्या, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान न्याय व हक्क बहाल केले आहेत. समाजातील महिला, शेतकरी, कामगार, विद्यार्थी व वंचित घटकांना मोफत कायदेशीर सल्ला व सहाय्य उपलब्ध करून देणे ही विधी सेवा प्राधिकरणाची जबाबदारी आहे. अशा महाशिबिरांमुळे न्याय व्यवस्था, शासन आणि जनता यांच्यातील दुवा अधिक मजबूत होतो. शासन विविध घटकांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवत असले तरी माहितीअभावी किंवा प्रक्रियेतील अडचणींमुळे अनेक पात्र नागरिक वंचित राहतात. हा महामेळावा शासन व जनतेमधील दरी कमी करणारे प्रभावी माध्यम ठरू शकतो, असे त्यांनी नमूद केले. पर्यावरणपूरक शेतीचा पुरस्कार करत शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमादरम्यान सुमारे तीन हजार लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ वितरित करण्यात आले. कृषी, माविम, उमेद, समाज कल्याण आदी विभागांच्या योजनांचा त्यात समावेश होता. विशेष म्हणजे, न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर यांनी एका वयोवृद्ध महिला लाभार्थ्यांना मंचावरून खाली उतरून लाभ प्रदान केला, तर न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांनी दिव्यांग लाभार्थ्याला सन्मानपूर्वक लाभ दिला. त्यांच्या या संवेदनशील कृतीचे उपस्थितांनी स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख जिल्हा न्यायाधीश शेखर मुनघाटे यांनी केले. सूत्रसंचालन रेणुका मोरे व श्री पौड यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव दिपक एच. दाभाडे यांनी केले.

# तळणीत शिवजयंती उत्साहात

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**आर्णी :** तालुक्यातील तळणी येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावात उत्साहपूर्ण वातावरणात शिवजयंती साजरी करण्यात आली. युवक आणि लहान बालकांनी पुढाकार घेत गावातील चौकात महाराजांचे भव्य चित्र उभारून अभिवादन केले. शिवजयंतीनिमित्त घोषणाबाजी, पुष्पहार अर्पण व सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी निधी बोक्षे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेच्या विचारांवर प्रभावी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष सुनील पोटगंटावर, पवन माळवी, विजू बोक्षे, साफिक हिरानी, प्रफुल जाधव, संदीप राठोड, मनोज, ललित बोक्षे, विजू पाठक, संजय बोक्षे, राजू बोक्षे, प्रकाश भोंडे, देविदास गायकवाड, सुधीर गावकवाड, अनिल पाठक, बापुराव हलबी, बापुराव परचाके आदींसह ग्रामस्थांची उपस्थिती लाभली. शिवजयंती उत्सवाचे आयोजन 'न्यू छावा मित्र मंडळ'तर्फे करण्यात आले. मंडळाच्या माध्यमातून महाराजांचे विचार घराघरापर्यंत पोहोचविण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमात नितीन बोक्षे, गणेश बोक्षे, शुभम हलबी,

### बालकांनी उभारले महाराजांचे चित्र

निशांत हलबी, निलेश हलबी, आकाश लोणकर, कश्यप कांबळे, गौरव हलबी, लकी डेहनकर, भाविक लोणकर, साई सर्वे, जितेंद्र रेकलवार, कुणाल परचाके, आनंद कांबळे, अक्षय कुधमते, गणेश मडावी, कार्तिक हलबी, सूरज बोक्षे, गजू घोडमारे, वैभव हलबी, चेतन दुतकर, यश डेहनकर आदी युवकांचा सक्रिय सहभाग लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी न्यू छावा मित्र मंडळ व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.



# तांडा ब्राम्हणवाडा येथे भागवत कथा सप्ताह

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**आर्णी :** तांडा ब्राम्हणवाडा येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित श्रीमद् भागवत कथा कार्यक्रमास कामगार आयुक्त मुंबई राजेश आडे व नीता आडे यांनी उपस्थित राहून कथा श्रवणाचा लाभ घेतला. कथास्थळी भक्तिमय वातावरणात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती.

कथा श्रवण करताना आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेतल्याची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ, भक्तगण, तरुण मंडळी, माता-भगिनींशी संवाद साधत जयंतीनिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमा दरम्यान सामाजिक उपक्रमाचाही समावेश करण्यात आला. पंधरा वर्षांखालील मुलांना कबड्डी किटचे वाटप करण्यात आले. खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे व भविष्यात ते उच्च पातळीवर यश संपादन करावेत, हा यामागील उद्देश आहे.






# 'पांढऱ्या सोन्या'चा काळा बाजार

**शेतकरी हतबल**

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**यवतमाळः** यंदाच्या हंगामात निसर्गाच्या लहरीपणाने आधीच आर्थिक तुटीतील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसमोर आता बाजारातील 'सुलतानी संकट' उभे ठाकले आहे. शासनाने जाहीर केलेल्या हमीभावाला हरताळ फासून खाजगी व्यापाऱ्यांकडून कापसाची सर्रास लूट सुरू असल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. घाम गाळून पिकवलेल्या 'पांढऱ्या सोन्या'ला कवडीमोल भाव मिळत असल्याने बळीराजा हतबल झाला आहे.



यंदा अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे उत्पादनात मोठी घट झाली. पिक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी कीडनाशके, औषध फवारणी आणि मजुरांवर भरपूर खर्च केला, पण माल बाजारात येताच व्यापाऱ्यांनी दर पाडले. "ओलावा जास्त आहे", "कापूस पिवळा पडला आहे" अशा कारणास्तव हमीभावापेक्षा २–३ हजार रुपये कमी दराने खरेदी सुरू झाली. शासकीय खरेदी केंद्रे अपुरी किंवा प्रक्रियेत मंदी असल्याने शेतकरी खाजगी व्यापाऱ्यांकडे वळत आहेत. याचा गैरफायदा घेऊन दर कमी ठेवला जात असल्याचा आरोप आहे. शेतकऱ्यांनी सांगितले, "खर्च वाढला, भाव घसरला; कर्जाचे हप्ते, घरखर्च, शेतीसाठी भांडवल उभे करणे कठीण झाले आहे." प्रशासनाकडून बाजारावर प्रभावी नियंत्रण नसल्याचे चित्र दिसते. शेतकरी संघटनांकडून हमीभावाने सक्तीची खरेदी, बाजार समित्यांमध्ये पारदर्शकता आणि व्यापाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. विदर्भातील अर्थकारणाचा कणा असलेल्या कापसाला योग्य भाव मिळाला नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतात. शेतकरी संघटना या परिस्थितीवर तातडीने हस्तक्षेप करण्याची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

# 'अब्बू, आमचा रोजा पूर्ण झाला!'

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**आर्णीः** रमजानच्या पवित्र महिन्यात उपवास, संयम आणि इबादतीचा संदेश देणाऱ्या रोज्यांच्या पार्श्वभूमीवर आर्णीतील शेख कुटुंबात भावनिक क्षण अनुभवायला मिळाला. पत्रकार सद्दाम शेख यांच्या दोन चिमुकल्या कन्यांनी आयुष्यातील पहिलाच रोजा पूर्ण करत कुटुंबाचा अभिमान वाढवला. अलमीरा सद्दाम शेख (७) आणि रीदा सद्दाम शेख (५) या बहिणींनी तब्बल सुमारे १४ तास अन्न-पाण्याचा त्याग करून सायंकाळी इफ्तारवेळी रोजा सोडला. एवढ्या लहान वयात दाखवलेला त्यांचा संयम आणि श्रद्धा उपस्थितांना भावली. 'अब्बू, आमचा रोजा पूर्ण झाला,' असे आनंदाने सांगताना त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहून कुटुंबीयही भारावून गेले. घरातील धार्मिक वातावरण, नियमित नमाज आणि रमजानमधील शिस्तबद्ध दिनचर्या यामुळेच मुलींमध्ये रोजाबद्दल आकर्षण निर्माण झाल्याचे कुटुंबीय सांगतात. विशेष म्हणजे, दोन महिन्यांपूर्वी शेख कुटुंबाने पवित्र मक्का आणि मदीना येथे उमराह यात्रा पूर्ण केली होती. त्या वेळी मिळालेल्या आध्यात्मिक अनुभूतीमुळे मुलींमध्ये धार्मिक संस्कार अधिक दृढ झाल्याची भावना व्यक्त होत आहे. आर्णी शहरात या चिमुकल्यांच्या पहिल्या रोज्याबद्दल कौतुक व्यक्त होत असून, शेख कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# महिलांसाठी 'स्व-रक्षा प्रशिक्षण'

**यवतमाळ :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून १९ फेब्रुवारी रोजी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने पिंपळगाव येथे विशेष 'स्वरक्षा प्रशिक्षण' वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

महिलांनी स्वसंरक्षणासाठी सक्षम व्हावे, या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या उपक्रमाला स्थानिक महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाला स्थानिक नगरसेविकांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षणादरम्यान महिलांना स्वसंरक्षणाची विविध तंत्रे आणि आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचा बचाव कसा करावा, याचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# स्थायी समिती सभापती पदी कोणाची वर्णी लागणार ?

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

## ♦ स्थायी समिती सभापती पदासाठी तिघांची नावे चर्चेत


**अकोला :** महापालिकेच्या स्थायी समितीच्या १६ सदस्यांची निवड १६ फेब्रुवारी सोमवारी झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष शहर सुधार आघाडीत कोणत्या पक्षाकडे महानगरपालिकेच्या तिजोरीच्या चाव्या असतील याकडे लागले आहे.

पहिल्या सर्वसाधारण सभेत फक्त स्थायी समितीच्या १६ सदस्यांची निवड करण्यात आली आहे. स्थायी समिती सभापती तसेच स्वीकृत सदस्यांची निवड अद्याप बाकी आहे. स्वीकृत सदस्यपदी कोणाला संधी द्यावी ही मोठी डोकेदुखी सत्ताधारी भाजपा समोर आहे कारण जागा कमी आणि इच्छुकांची संख्या जास्त आहे.

स्थायी समिती अध्यक्ष निवडणुकीची तारीख निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाला पत्र पाठवले जाईल.

महापालिकेतील सत्ताधारी शहर सुधार आघाडीमध्ये भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट, शिवसेना व अपक्ष यांचा समावेश आहे. १६ सदस्यांच्या स्थायी समितीमध्ये शहर सुधार आघाडीच्या नऊ नगरसेवकांना संधी मिळाली आहे. तर काँग्रेसचे चार सदस्य, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचा एक सदस्य, एक वंचित बहुजन आघाडीचा सदस्य तसेच एका एमआयएमच्या सदस्याला संधी मिळाली आहे. यावेळी महापालिकेत कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत नसल्याने भाजपाने शहर सुधार आघाडीचे गठन करीत सत्ता स्थापन केली आहे. महापौर आणि उपमहापौर भाजपाचा असल्याने स्थायी समिती पदी आता कोणाची लॉटरी लागते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी शहर सुधार आघाडीतील कोणत्या पक्षाकडे महापालिकेच्या तिजोरीची चावी असेल. याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. फेब्रुवारीच्या या आठवड्यात स्थायी समिती सभापतींची निवडणूक होण्याची अपेक्षा आहे. स्थायी समितीचा सभापती कोण होईल? परत तोच चेहरा रिपीट होणार काय ? की अन्य दुसऱ्याला संधी मिळेल? ही चर्चा महापालिका वर्तुळात रंगली आहे. महापालिकेच्या तिजोरीची चावी आपल्या हातात घेण्यासाठी सर्वच इच्छुक विशेष सभा होण्याची वाट पाहत आहेत. स्थायी समिती सदस्यांमध्ये शहर सुधार आघाडीचे विजय अग्रवाल यांच्यासोबतच हरीश आलिमचंदानी व विनोद मापारी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. परंतु या सर्वांमध्ये विजय अग्रवाल यांचेच नाव जवळपास निश्चित मानले जात आहे. महापालिका चालविण्याचा त्यांच्या गाठीशी मोठा अनुभव असल्याने, त्यांचे नाव प्रभावी मानले जात आहे. महापालिकेत प्रशासक राज असताना सुद्धा त्यांचा महापालिकेत शब्द चालत असे. आता तर महापालिकेत भाजपाची सत्ता आली आहे. आपल्या विरोधात जाणाऱ्यांचा पत्ता कट करण्यात विजय अग्रवाल तरबेज आहेत. त्यामुळे सभापती पदासाठी ते प्रमुख दावेदार मानले जात आहेत. तर दुसरीकडे महापौर निवडणुकी प्रमाणेच यावेळेसही विरोधी पक्ष स्थायी समिती सभापती पदासाठी सर्व विरोधीं पक्षांची मोट बांधण्याची शक्यता वर्तवली जात आहे. परंतु एमआयएम च्या नगरसेवकांना आपल्या गोटात आणणे आणि शहर सुधार आघाडीच्या नगरसेवकांना फोडणे ही अशक्यप्राय बाब असल्याने स्थायी समिती सभापतीपदी शहर सुधार आघाडीचा नगरसेवक बसणार हे निश्चित आहे.हे पाहता शहर सुधार आघाडीच्या सर्व नगरसेवकांना एकजूट ठेवण्याचे मोठे आव्हान भाजपा समोर उभे ठाकले आहे.

# मनारखेड कलशारोहण सोहळ्यात पैशांची उधळण !





प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**बाळापूर :** तालुक्यातील मनारखेड येथे २२ फेब्रुवारी रोजी हनुमान मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यात कलश स्थापना करण्यात आली. यावेळी कळसावरून पैशांची व प्रसादाची उधळण करण्यात आल्याने भाविकांची एकच गर्दी उडाली. हे पैसे व प्रसाद मिळण्यासाठी भाविकांनी एकमेकांच्या अंगावर चढत मोठी गर्दी केली होती. त्यामुळे चेंगराचेंगरी होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मंदिरावर कलशारोहण करताना धार्मिक विधी म्हणून प्रसादाची उधळण करण्यात येते. यामध्ये काही कोऱ्या नोटा, नाणी व सुका मेवा असून तो प्रसाद म्हणून उधळण्यात आला. या महोत्सवाला जवळपास दीड ते दोन हजार भाविकांची उपस्थिती होती. त्यात गावातील लेकीबाईंचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. प्रसादाची उधळण होताच उपस्थित भाविकांनी तो मिळविण्यासाठी एकच झुंबड केली. काही जण थेट मंदिरात उभारलेल्या मंडपावर चढण्याचा प्रयत्न करत होते, तर काहीजण वाऱ्याच्या दिशेने उडणाऱ्या नोटांच्या मागे धावताना दिसले. वाऱ्यामुळे या नोटा मंदिरापासून लांबच लांब उडून गेल्याने त्यामागे भाविकही धावताना दिसून आले. या प्रकारामुळे काही काळ चेंगराचेंगरीसदृश स्थिती निर्माण झाली होती. मात्र, सुदैवाने यात कोणतीही अनुचित घटना घडली नाही. मात्र सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अशाप्रकारे पैशांची उधळण करणे योग्य आहे का, कारण या ठिकाणी हजारो भाविक होते, यावेळी एखादी अनुचित घटना घडली असती तर, यास जबाबदार कोण, असा प्रश्नही सुज्ञ नागरिकांकडून विचारला जात आहे.

◆हा एक धार्मिक विधी आहे. प्रत्येक ठिकाणी कलशारोहण करताना प्रसादाची उधळण करण्यात येते. भाविक हा प्रसाद मिळविण्याचा प्रयत्न करतात. यातील प्रसाद एकमेकांना वाटतात आणि नाणी किंवा पैसे किंवा इतर धातू हाती लागल्यास ते आपल्या देव्हाऱ्यात प्रसाद म्हणून ठेवतात. तसाच प्रकार या ठिकाणी झाला. यात कोणतीही अनुचित घटना न घडता कार्यक्रम शांततेत पार पडला.

- **संदीप पाटील,** लोकसभा समन्वयक राष्ट्रवादी अजित पवार तथा मंदिर विश्वस्त, मनारखेड

# अतिक्रमण काढले पण, मनपाने रस्ता का केला नाही

## रेल्वे स्टेशन चौकातील ते अतिक्रमणाची सफाई का नाही

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी



**अकोला :** स्टेशन चौकातील इतर अतिक्रमणाकडे दूर्लक्ष करत महापालिकेने पाणी पुरवठाच्या टाक्यांचा रस्ता असल्याचे कारण करत एक अतिक्रमण साफ केले. पण, ते जैसे थे ठेवले गेले. ते काय तसेच ठेवले असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याच बरोबर स्टेशन चौकातील इतर अतिक्रमणावर आयुक्त कारवाई करतील काय अशी विचारणा आता होत आहे.

नेत्यांनी सांगितले आणि महापालिकेने कारवाई केली अशी या अतिक्रमण कारवाईची चर्चा शहरात रंगली आहे. केवळ नेत्यांमध्ये असलेल्या अति महत्वाकांक्षा आणि दूसऱ्या नेत्याला हिणविण्यासाठी हे अतिक्रमण काढले गेले.

पण, ते पुर्ण का काढण्यात आले नाही. आणि ज्या ठिकाणी रस्ता असल्याचा दावा केला गेला त्या ठिकाणी तो महापालिकेने त्वरीत का बांधला नाही अशी विचारणा होत आहे. ज्या ठिकाणी अतिक्रमण काढले गेले त्या ठिकाणी किती अधिकृत बांधकामे आणि किती अनधिकृत याच्या फाईल्स आयुक्त पाहतील काय अशी विचारणा होत आहे. केवळ राजकीय नेत्यांच्या इशाऱ्यावर कारवाया होत असतील तर शहर छळ छावणी होण्याची शक्यता आहे. महापालिका आयुक्तांनी इतर ही अतिक्रमणावर लक्ष देण्याची मागणी समोर येत आहे.

# वऱ्हाडी जत्रेत महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित नियोजन शून्य कारभाराची अधिक चर्चा

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्हा परिषद प्रशासनाच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत उमेद प्रकल्पांतर्गत आयोजित 'वऱ्हाडी जत्रा विभागीय स्तरीय प्रदर्शन २० ते २४ फेब्रुवारी दरम्यान शहरातील लालबहादूर शास्त्री स्टेडियम येथे आयोजित करण्यात आली आहे. या प्रदर्शनात ग्रामीण भागातून आलेल्या महिला बचत गट तसेच संपूर्ण जिल्ह्यातून प्रदर्शनाला भेटी तसेच खरेदी करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

या ठिकाणी येणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी महिला पोलिस कोठेही दिसल्या नाही. लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा मोजकेच असल्याने महिलांचा सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. वऱ्हाडी जत्रा प्रदर्शनात आज अनेक महिला आपल्या परिवारासह उपस्थित होत्या. परंतु त्यांच्या सुरक्षेबाबत या ठिकाणी कोणतीही उपायोजना केलेली दिसली नाही. महिलांच्या सुरक्षेमध्ये झालेली चूक मोठी घटना घडवू शकते. याबाबतची कल्पना आयोजन समितीला नव्हती का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या ठिकाणी उभारण्यात आलेल्या डोमच्या बाहेर फक्त दोन पुरुष पोलिस कर्मचारी उपस्थित होते तर महिला पोलीस कोठेही नव्हत्या. आयोजन समिती तसेच जिल्हा परिषद प्रशासनाबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# संस्कृतीची अपहरणानंतर नाशिक येथे झाली हत्या

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला / नाशिक:** कोचिंगसाठी आलेल्या संस्कृतीचे अकोल्यातून अपहरण झाले आणि नाशिक येथील हत्येची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणात सिव्हिल लाईन्स पोलिसांनी संस्कृतीच्या अपहरण प्रकरणात काय तपास केला याची विचारणा आता होत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील अर्थव देशमुख व एकाला नाशिक पोलिसांनी अटक केली आहे. संस्कृतीच्या हत्येप्रकरणात इतर आरोपींचा शोध नाशिक पोलिस घेत आहे.

अकोल्याच्या सिव्हिल लाईन्स पोलिसात संस्कृतीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. त्या गुन्ह्यात सिव्हिल लाईन्स पोलिसांनी गतीने तपास केला असता तर नाशिकच्या सारूळ जंगलात संस्कृतीचा मृतदेह मिळाला नसता अशी चर्चा आता रंगली आहे. संस्कृती आणि अर्थव देशमुख यांच्यात प्रेम संबंध होते. संस्कृती अकोल्यात दूसऱ्या कोणासोबत तरी प्रेमात गुंतत चालली आहे. या संशयाच्या भुताने नाशिक येथे राहत असलेल्या अर्थव देशमुख याने रागातून संस्कृतीची हत्या केली. ही हत्या ऐवढी क्रुर होती की संस्कृतीच्या गळ्यात चाकू जशाच्या तसाच होता. हत्येनंतर सारुळ च्या जंगलात तिचा मृतदेह फेकण्यात आला. संस्कृतीच्या कि चेन वरुन तीची ओळख पटविण्यात नाशिक पोलिसांना यश आले. या प्रकरणात बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथील रहिवासी अर्थव गजानन देशमुख व सुमित देवानंद सानप याला पोलिसांनी अटक केली आहे. हत्येच्या प्रकरणात इतर कोणी आरोपी आहेत काय त्याचा शोध नाशिक पोलिस घेत आहे. कोचिंगसाठी आलेली संस्कृती अकोल्यात होस्टेलला राहत होती. तिचे अपहरण झाल्याची तक्रार सिव्हिल लाईन्स पोलिसात दाखल होती. या प्रकरणात सिव्हिल लाईन्स पोलिसांनी किती स्फुर्तीने तपास केला याचा शोध पोलिस अधिक्षक अर्चित चांडक यांना घेण्याची गरज आहे. इतकेच नाही तर कोचिंग एरियात चिडीमारी आणि झोपडपट्टी दादांवर कठोर कारवाईची मागणी समोर येत आहे. अकोल्याच्या कोचिंग इंडस्ट्रिसाठी ही धोक्याची घंटा आहे. अकोल्यात शिकायला येणाऱ्या तरुणी सुरक्षित नसतील आणि त्यांचे अपहरण होत असेल तर समाजासाठी मोठी चिंतेची बाब अधोरेखित होत आहे.

# होळीसाठी बाजारात रंग, मुखवटे उपलब्ध

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

## ♦ शहरातील विविध भागात दुकाने थाटली



**अकोला :** होळीचा सण आता अवघ्या काही दिवसांवर आला असून शहरातील मुख्य बाजारपेठांमध्ये खरेदीला जोर आला आहे. होळी उत्सवासाठी लागणाऱ्या विविध सामुग्रीच्या दुकानांनी बाजार सजला आहे.

बाजारात पूजन साहित्य, रंग, पिचकाऱ्या आणि गाठ्या मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. गाठ्यांचे दर ८० रुपयांपासून १२० रुपयांपर्यंत, हर्बल रंग २० व ५० रुपयांच्या पॅकेटमध्ये, तर उच्च दर्जाचे रंग ८० रुपयांच्या पॅकेटमध्ये विकले जात आहेत. लहान मुलांसाठी यंदा विशेष आकर्षण ठरत आहेत फिल्मी कार्टून आणि फॅन्सी पिचकाऱ्या. छोटा भीम, मोटू-पतलू, शक्तिमान, शिन-चॅन आदी लोकप्रिय पात्रांच्या पिचकाऱ्या ४० रुपयांपासून ४८० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. रंगीत पिचकाऱ्या आणि बलूनकडे मुलांचा विशेष कल दिसून येत आहे. विक्रेत्यांच्या मते, सण जवळ येताच बाजारातील गर्दी आणि खरेदी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# शेगाव बस रस्त्यात बंद पडली आणि ट्रॅफिक जॅम झाला

## बराच उशिरा पर्यंत दुरूस्ती सुरू होती

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी



**अकोला :** ट्रॅफिक जॅम ही समस्या काही पुणे मुंबई पुरती मर्यादित राहिली नाही तर अकोला शहरात देखील विविध कारणांमुळे जॅम लागतो. नागरिक त्रासतात. रविवारी दुपारी मोठ्या पोस्ट ऑफिस समोर शेगाव अकोला बस अचानक बंद पडली. त्यामुळे वाहनांची रांग लागली होती. बस दुरूस्तीला बराच वेळ लागला.

शेगाव अकोला बसचा एअर पाईप निघाल्यामुळे गाडी बंद पडली होती. त्यामुळे रहदारीला खोळंबा झाला. बस अशा ठिकाणी बंद पडली की मागची वाहने निघणे शक्य नव्हते. शहरातील वाहतूक सुरळीत होईल का असा प्रश्न शहरवासीयांना कायम पडलेला असतो. कारण शहरातील विविध भागात दररोज कोणत्या तरी रस्त्यावर जॅम लागतो. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. ही समस्या दूर होईल का अशी विचारणा स्थानिक रहिवासी करीत आहेत. रविवारी दुपारी पोस्ट ऑफिस चौकात वाहतूक विस्कळीत झाली होती. वाहतूक शाखा पोलिसांना तेथे पोहचून रस्ता मोकळा करून द्यावा लागला.

# 'वय वंदना कार्ड' मोहीम

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला :** एकत्रित आयुष्मान भारत योजना- प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत ७० वर्षांपुढील व्यक्तींसाठी 'वय वंदना कार्ड' मोहिम जिल्ह्यात हाती घेण्यात आली आहे. त्याचा लाभघेण्यासाठी संबंधित नागरिकांनी जिल्ह्यात सेतू केंद्रे किंवा आपल्या गावातील आशासेविकांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वयाची ७० वर्ष पूर्ण झालेल्या किंवा त्यावरील वयाच्या व्यक्तींना या योजनेचा लाभमिळणार आहे.

# मोठ्या राम मंदिरात होळी उत्सवाला आरंभ

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी





**अकोला :** कृष्ण आणि राम भक्तांची अनोखी रसिया चंग सामाजिक समरसतेचा संदेश देणारा होळी उत्सव संत गजानन महाराजांचा पावन स्पर्श लाभलेल्या मोठ्या राम मंदिरात येथे होळी उत्सव आरंभ झाला.

वृंदावन मथुरा येथून नैसर्गिक रंग अयोध्या येथे जातात आणि अयोध्या येथे त्या रंगातून होळी खेळण्यात येते त्याच धर्तीवर पंचवीस वर्षांपूर्वी श्री जानकी वल्लभो धर्मार्थ संस्था, श्रीराम हरिहर, संस्था, पुष्करणा चेतना समिती, श्रीराम नगर मित्र मंडळ च्या वतीने नैसर्गिक रंग आणि फुलांची होळी या परंपरेनुसार हा कार्यक्रम मातृ शक्ती युवाशक्ती सर्व वर्गातील नागरिकांच्या सहकार्याने हा अभिनव कार्यक्रम रविवारी दुपारी झाला. आरंभी मंदिराच्या अध्यक्ष सुमनदेवी अग्रवाल यांच्या हस्ते श्रीराम व कृष्ण प्रतिमेचे पूजन करण्यात आले. राजस्थानी ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विजय तिवारी, कैलास बोहरा(खामगांव), राधेश्याम शर्मा, अमरचंद जोशी , पंडित सौरभ छांगाणी, पंडित महेश जोशी, पंडित हेमंत शर्मा, किसनगोपाल पुरोहित, महेंद्र पुरोहित यांनी पूजा केली. होली के रसिया, आठ वर्ष कृष्ण कन्हैया सोला बरस की राधा राणी, श्याम आज बिरज मे होली रे रसिया, खाटू नरेश श्यामबाबा, श्रीरामदेवबाबा , राधा राणी, यांची भजने गाण्यात आली भजने व कृष्णा आणि राधांच्या होळी संदर्भात संवाद भजने खामगाव येथून आलेल्या गायकांनी तसेच राधाकृपा सत्संग मंडळांनी भक्तांना मंत्रमुग्ध केले. ? पंचवीस वर्षापासून गिरीश जोशी यांच्या कल्पनेतून ही होळी करण्यात येते.

यामध्ये गिरीराज तिवारी, अनिल मानधने ,विलास अनासने यांच्या माध्यमातून हा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमात श्री अनील थानवी, दिनेश जोशी , गोपेश बोहरा, वल्लभ बोहरा, हरीश जोशी, सौरभ छांगाणी ,अशोक छांगाणी, दिलीप छांगाणी, राधेश्याम छांगाणी(खामगांव ढोलक वादक) दीपक छांगाणी (तेल्हारा), दीपक छांगाणी(तिवसा) अजय जोशी, विनय जोशी, अजय व्यास, नंदकिशोर व्यास, पुखराज छांगाणी, सुरेश व्यास, विजय व्यास , महेश जोशी, कृष्णा बोहरा, मेघराज बोहरा, एड महेंद्र व्यास, एड वीरेंद्र व्यास, शक्तिसिंह पुरोहित, गिरीश छांगाणी, कन्हैयालाल छांगाणी, रूपेश छांगाणी, तुषार पुरोहित, धर्मेश पुरोहित, जुगलकिशोर जोशी, सुबोध जोशी, पुरुषोत्तम बिस्सा, नटवरलाल पुरोहित, कमलेश पुरोहित, हितेश छांगाणी, गोविंद छांगाणी, डॉ आनंद छांगाणी गिरीराज पुरोहित, वल्लभ पुरोहीत, हुकुमचंद छांगाणी, महादेव वानरे(ढोलक वादक) कान्हा बासु, महेश दिली, नवल बानीया परिवाराने सेवा दिली. अकोला शहरात दहा दिवस हा उत्सव वेगवेगळ्या ठिकाणी साजरा होणार आहे.

# उद्या अविनाश परळीकर यांचे कीर्तन

प्रतिनिधी २३ फेब्रुवारी



**अकोला :** मुंगसाजी माउलींच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवार, २४.२.२०२६ रोजी सकाळी ११ वाजता कीर्तनकार ह.भ.प. अविनाश परळीकर यांचे कीर्तन होणार आहे. 'चिंचविश्राम भुवन', मुंगसाजी महाराज संस्थान धामणगाव देव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तबलासंगत धीरेंद्र गावंडे व हार्मोनियमवर डॉ. सुशील देशपांडे कारंजा करतील. पुण्यतिथी महोत्सवात विविध कार्यक्रम आयोजिले आहे.

# दिव्यांग सहायक पोर्टल, मोबाईल ॲप विकसित




प्रतिनिधी २३ फेब्रुवारी

**अकोला :** दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभसुलभ, पारदर्शक आणि वेळेत मिळावा, यासाठी दिव्यांग कल्याण विभागाने दिव्यांग सहाय्यक पोर्टल हे एकात्मिक ऑनलाइन पोर्टल आणि मोबाईल ॲप विकसित केले आहे. यामुळे सेवा वितरणाला डिजिटल गती मिळणार असून दिव्यांगांच्या सेवा वितरण होणार अधिक सुलभ व पारदर्शक होणार आहे. दिव्यांगत्व असलेल्या नागरिकांना त्यांच्या पात्रतेनुसार योजना शोधणे, अर्ज करणे आणि लाभ मिळविणे अधिक सोपे व्हावे, या उद्देशाने हे ऑनलाईन पोर्टल विकसित आले आहे.

दिव्यांगासाठी राज्यशासनाने अनेक योजना आखल्या आहेत. विविध योजनांचा त्यांना लाभ व्हावा या अनुषंगाने दिव्यांग सहायक पोर्टल ॲप विकसित करण्यात आले आहे. याचा त्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK